# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### महावितरण कंपनीकडून ग्रामीण भागातील वीज पुरवठ्याचा अभ्यासगट स्थापना केल्याबाबत

**(१) ५७८० (१५-०४-२०२०). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.शहाजीबापू पाटील (सांगोले), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी क्षेत्राला चालना देण्यासाठी महावितरणाकडून कृषी पंप व अन्य कामांसाठी देण्यात आलेल्या विज जोडण्यातील पुरवठयात असंख्य त्रुटींमुळे विजेची मोठयाप्रमाणात हानी होत असल्याचे माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी क्षेत्रासाठी करण्यात येणा-या वीज पुरवठयात ७० टक्के ग्राहकांकडे मिटर नसणे, मोठयाप्रमाणात वीज ग्राहकांची देयके थकीत असणे व वीज गळतीमुळे सरासरी ३० ते ४० टक्के विज हानी होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागात कृषी क्षेत्रासाठी होत असलेल्या वीज पुरवठयातील त्रुटींमुळे होणा-या विजेच्या हानीबाबत पाहणी करण्याकरिता शासनाने सन २०१८ मध्ये अभ्यास गट स्थापन केला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अभ्यास गटाने महाराष्ट्र वीज नियामक आयोगाला वीज पुरवठयातील विविध त्रुटींमुळे होणा-या वीज हानीचा अंतरीम अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास , कृषी क्षेत्रातील होणा-या वीज हानीला आळा बसण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

परंतु जानेवारी-२०२० मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महाराष्ट्रातील कृषीपंपाचा वीज वापराच्या अभ्यासाबाबत नेमलेल्या अभ्यास गटाने त्यांच्या अहवालामध्ये अशा स्वरुपाचे निरीक्षणे नमूद केली आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

महावितरणची २०२२-२३ ची वितरण हानी १४.५६% इतकी आहे. तसेच कृषी वीज ग्राहकांची थकबाकी मार्च-२०२३ अखेरीस रु. ५०७४६ कोटी इतकी आहे.

(३) हे खरे आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने सन २०१७ च्या प्रकरण १९५ मध्ये दि. १२.०९.२०१८ रोजी दिलेल्या निर्णयानुसार दि. ०२.११.२०१८ रोजी कृषीपंपासाठी होणाऱ्या वीज वापराबाबत अभ्यासगट गठीत केलेला होता.

(४) हे खरे आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या अभ्यास गटाने सादर केलेल्या अहवालामध्ये महाराष्ट्रातील कृषीपंपाचा वीज

वापराबाबत निरीक्षणे नमूद केलेली आहेत. परंतु सदर अहवालातील काही निरीक्षणांवर महावितरणचा आक्षेप असल्यामुळे महावितरणने अपिलीय प्राधिकरणामध्ये (APTEL) याचिका दाखल केली आहे व त्याचा निर्णय अद्याप प्राप्त झाला नाही.

(५) अहवालामधील सुचनांप्रमाणे कृषीपंप वीज बिल संदर्भात नमूद केलेल्या पध्दतीनुसार जून-२०२० पासून निवडलेल्या कृषी वाहिन्यांवरील ग्राहकांची वीज बिले देण्यात येत आहेत. तसेच त्याच निर्देशांकावर आधारित महावितरणचा कृषी वीज वापर आयोगामार्फत निश्चित करण्यात येत आहे.

(६) महावितरणच्या अभ्यासानुसार वीज वितरण वाहिन्यांची तांत्रिक वीज हानी ही ८ टक्क्यापर्यंत आहे. कृषी क्षेत्रातील होणाऱ्या तांत्रिक व वाणिज्यीक वीज हानीला आळा बसविण्याच्या दृष्टीने सौर कृषीपंप आणि उच्च दाब वीज वितरण प्रणाली व्दारे कृषी पंप जोडणी या योजना कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत तसेच फिरत्या पथकांव्दारे अनधिकृत कृषी पंप ग्राहकांची तपासणी, नविन कृषी वीज पंपाची जोडणी, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० योजनेअंतर्गत कृषी वीज वाहिनी सोलरायझेशनचे उध्दिष्ट "मिशन-२०२५" म्हणून निश्चित केले आहे, इत्यादी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

---

## म्हाडाच्या प्रलंबित असलेल्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत

**(२) १२८४४ (१९-०९-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या प्रलंबित असलेल्या पुनर्विकास प्रकल्पास स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेने अर्थसहाय्य देण्याची तयारी दर्शविली असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या गृहनिर्माण विभागाच्या आणि स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्यात उच्चस्तरीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत म्हाडावर विश्वास दर्शविण्यात आला असून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (एसआरए) कारभाराबाबत अत्यंत नकारात्मक दृष्टिकोन मांडण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०४-१०-२०२३) :**(१) गृहनिर्माण क्षेत्राला वित्त पुरवठा करण्यासंदर्भात उपाययोजना सूचविण्याबाबत दि.२७.०१.२०२० रोजी स्टेट बँक ऑफ इंडियाचे प्रतिनिधी, म्हाडा व झोपू प्राधिकरणासमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. परंतू, बैठकीनंतर प्रलंबित पुनर्विकास प्रकल्पांना अर्थसहाय्य देण्याबाबतचा प्रस्ताव म्हाडाला प्राप्त झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईमध्ये ट्रॉम्बे चिता कॅम्प भागातील डी व ई सेक्टर मध्ये मोठ्या प्रमाणात वीज चोरी होत असल्याबाबत

**(३) ४०४२३ (२८-०३-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये ट्रॉम्बे चिता कॅम्प भागातील डी व ई सेक्टर मध्ये मोठ्या प्रमाणात वीज चोरी होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वीज चोरी संदर्भात स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करुनही सदर तक्रारींकडे पोलिसांकडून व स्थानिक प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वीज चोरीला आळा घालण्याच्या दृष्टिने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२३) :** (१) हे खरे असल्याचे मे. अदानी इलेक्ट्रिसिटी, मुंबई लि. यांनी कळविले आहे.

चित्ता कॅम्प व ट्रॉम्बे क्षेत्र मे. अदानी इलेक्ट्रिसिटी, मुंबई लिमिटेड या वीज वितरण च्या कार्यक्षेत्रात असून अत्यंत दाट झोपडपट्टी क्षेत्र आहे. सदर कंपनीस या भागात अडचणीमुळे व वीज चोरीमुळे विश्वसनीय वीज पुरवठा करण्यात अडचणी येत आहे.
(२) वीज वितरण कंपनी स्थानिक पोलीसांच्या मदतीने छापे टाकून वीज चोरीबाबत ८६ प्रथम खबरी अहवाल नोंदविले आहेत.
(३) वीज चोरीवर नियंत्रण व आळा घालण्याच्या दृष्टीने राज्यातील सर्व वीज वितरण कंपन्यांना स्थानिक पोलिसांनी त्वरीत एफ आय आर नोंदवून तपास करुन न्यायालयात दावे दाखल करण्याबाबत प्राधान्य देण्याबाबत सर्व संबंधिताना सूचना देण्याची गृह विभागास विनंती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज, अंबाजोगाई व बीड (जि.बीड) तालुक्यात महावितरणच्या वसुली निधीतून कामे करण्याबाबत

**(४) ४२९३६ (०९-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज, अंबाजोगाई व बीड (जि. बीड) तालुक्यात शेतकऱ्यांच्या शेतीपंपाच्या देयकांची वसुली विहीत वेळेत होत असून झालेल्या वसुलीच्या ३३% रक्कम ज्या गावांमध्ये वसुली झाली त्या गावांत खर्च करण्याचा व ३३% सदरहू मतदारसंघातील इतर गावांच्या कामावर खर्च करण्याचा निर्णय महावितरणने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसुलीत केज मतदार संघातील विजेची विविध कामे तातडीने करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी ऊर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या कामापैकी किती कामे पूर्ण करण्यात आली, उक्त कामांसाठी किती रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला व खर्च करण्यात आला अथवा करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन केज मतदार संघातील महावितरणच्या वसुली निधीतून विकास कामे होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०९-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२० नुसार २०२० नुसार व शासनाचे दि.२७.०४.२०२३ रोजीच्या निर्देशित केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार, कृषीपंप वीज ग्राहकांकडून वसूल झालेल्या एकूण थकबाकीच्या ३३% रक्कम संबंधित ग्रामपंचायत स्तरावर असलेल्या कृषीपंप ग्राहकांना नवीन वीज जोडणीसह संबंधित ग्रामीण भागातील वीजेच्या पायाभूतत सुविधा (नवीन तसेच सक्षमीकरण) तसेच सेवा सुधारण्याकरिता व ३३ % रक्कम जिल्हा स्तरावरील महावितरणच्या वीजेच्या पायाभूत सुविधा उभारण्याकरीता वापरण्यात येते.
(२) हे खरे आहे.
(३) उपरोक्त निवेदनानुसार स्थानिक लोकप्रतिनिधींनी अतिभारीत ६३ केव्हीए च्या रोहित्रे ऐवजी १०० केव्हीए चे रोहित्र बसविणे, अतिभारीत १०० केव्हीए रोहित्रावरील भार कमी करण्याकरिता अतिरिक्त १०० केव्हीए रोहित्र बसविणेबाबत मागणी केली होती.

कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२० अंतर्गत १०० केव्हीए च्या ७ नवीन व ६३ केव्हीए च्या ४ रोहित्रांची कामे पूर्ण करण्यात आली असून त्याकरीता रु. ४५ लाख इतका निधी खर्च करण्यात आला आहे. तसेच १०० केव्हीए चे १ अतिरिक्त रोहित्र बसविण्याचे काम पुर्ण करण्यात आले असून त्याकरिता रु. १.८० लाख इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

(४) शासनाने निर्देशित केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार बीड जिल्हयामध्ये जिल्हा स्तरावर रु.४.७० कोटी व ग्रामपंचायत स्तरावर रु. ४.७० कोटी असा एकूण रु. ९.४० कोटी इतका कृषी आकस्मिकता निधी असून सदर निधीतून नवीन उपकेंद्र, उच्चदाब वाहिनी, लघुदाब वाहिनी, नवीन रोहित्र अशी विविध रु. ८.५१ कोटीची कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे कृषी आकस्मिकता निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईसह राज्यातील अनेक भागात एप्रिल, २०२२ पासून वीज चोरी प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(५) ४५२०४ (२१-०९-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील अनेक भागात भारनियमन होत असल्याचे माहे एप्रिल २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या तुलनेत कमी विजेचा पुरवठा ग्राहकांना करण्यात येऊन काही ठिकाणी वीज प्रवाह खंडित करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईसह राज्यात अनेक भागातून वीज चोरीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून मुंबईत माहे एप्रिल, २०२२ मध्ये २५ पेक्षा जास्त वीज चोरीचे गुन्हे विविध पोलीस स्टेशनमध्ये नोंदविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अघोषित भारनियमन टाळण्यासाठी व वीज चोरी रोखण्यासाठी शासनाच्या वतीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

देशात उद्भवलेल्या कोळसा टंचाईमुळे महावितरण कंपनीने करारीत केलेल्या कोळशावर आधारित औष्णिक विद्युत निर्मिती प्रकल्पांमधून माहे एप्रिल २०२२ दरम्यान ६% ते ७% इतकीच वीज उपलब्ध होत असल्यामुळे राज्यात वीजेचा तुटवडा निर्माण झाला होता. तसेच, माहे एप्रिल २०२२ व मे २०२२ सुमारास वीजेच्या मागणीतही अचानक वाढ निर्माण झाल्यामुळे वीजेची उपलब्धता व मागणी यांमध्ये तफावत निर्माण झाली होती. परिणामी, विद्युत प्रणालीच्या सुरक्षिततेसाठी माहे एप्रिल २०२२ मध्ये राज्यभार-प्रेषण केंद्राकडून राज्यातील काही वाहिन्यांवर तात्पुरत्या स्वरुपाचे आपतकालीन भारनियमन काही दिवस वीज प्रणालीच्या सुरक्षिततेसाठी आवश्यकतेनूसार लागू करण्यात आले होते.

मे. अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई लिमिटेड, (एईएमल) मे. टाटा पॉवर कंपनी लिमिटेड व बृन्हमुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमांव्दारे (बेस्ट) माहे एप्रिल, २०२२ मध्ये भारनियमन करण्यात आलेले नाही.

(२) मे. एईएमल च्या व मे. टाटा पॉवर यांच्या वीज वितरण क्षेत्रात ग्राहकांना विजेचा पुरेसा पुरवठा करण्यात येत होता.

दिनांक २६.०४.२०२२ रोजी एमएसइटीसीएल ची कळवा ते पडघा ४०० केव्हीच्या पारेषण विद्युत वाहिनीची वहन क्षमतेपेक्षा अतिरिक्त भारामुळे, काही काळाकरिता वीज खंडीत झाली होती. त्यामुळे मुंबईतील बेस्ट वितरण कंपनीच्या क्षेत्रातील माहिम, धारावी व आजूबाजूच्या भागात वीज पुरवठा बंद झाला होता.

माहे एप्रिल २०२२ मध्ये वीजेची मागणी व उपलब्धता यांमध्ये तफावत निर्माण झाली होती. तसेच, खुल्या बाजारातून सुध्दा वीज उपलब्ध होत नव्हती. त्यामुळे विद्युत प्रणालीच्या सुरक्षिततेसाठी राज्यभार-प्रेषण केंद्राकडून राज्यातील महावितरणच्या कार्यक्षेत्रातील काही वाहिन्यांवर तात्पुरत्या स्वरुपाचे आपतकालीन भारनियमन काही दिवस आवश्यकतेनुसार करण्यात आले होते.

(३) होय हे खरे आहे.

(४) बेस्ट उपक्रमाने विविध उपाययोजना करुन सातत्याने करुन सातत्याने वीज चोरीचे प्रमाण कमी ठेवले आहे. खाली दिलेल्या उपाययोजना प्रभावी पध्दतीने अंमल केला जातो.

(१) कामकाजाच्या सोयासाठी दक्षता (विपु) विभागमध्ये दक्षिण व उत्तर अशा दोन स्वतंत्र विभागाची स्थापना केली असून वीज मीटर मध्ये फेरफार, थेट वीज जोडणी आणि अनधिकृत वीज वापर अशा प्रकारच्या वीज चोरीच्या प्रकरणांचा शोध घेण्यासाठी विशेष कृती दल आणि तपासणी दल कार्यरत केले आहेत.

(२) जेथे वीज चोरी मोठया प्रमाणात होण्याची शक्यता आहे. उदा. झोपडपट्टी, संक्रमण शिबिरे अशा ठिकाणी रविवारी आणि सुटयांच्या दिवशीही विशेष धाडसत्रांचे आयोजन करण्यात येते.

(३) उपहारगृहे, मॉल,वातानुकूलित व्यापारी आस्थापनाच्या वीज वापराच्या नोंदीचे विश्लेषण करुन, संशयित आस्थापनावर पाळत ठेवून धाडीचे आयोजन केले जाते.

(४) वीज चोरीच्या प्रकरणांची माहिती प्रामाणिक नागरिकांतर्फे विशेष प्रोत्साहन योजनेव्दारे मिळविली जाते.

(५) वीज देयकाचे प्रदान न केल्यामुळे किंवा वीज चोरीच्या प्रकरणामध्ये वीज मीटर काढून टाकलेला आहे अशा जागांची नियमित तपासणी व चौकशी करुन त्या ठिकाणी धाडीचे आयोजन केले जाते.

महावितरणव्दारा भारनियमन टाळण्यासाठी उच्चतम मागणी कालावधीत शक्य तितक्या अधिक क्षमतेने औष्णिक व जलविद्युत निर्मिती करणे, तसेच खुल्या बाजारातून आवश्यकतेनुसार वीज खरेदी करणे इत्यादी उपाययोजना करण्यात आल्या होत्या. वीज चोरी रोखण्यासाठी महावितरण कंपनीकडून विभागीय पातळीवर व विविध स्तरावर वीज ग्राहकांच्या वीज संचाची तपासणी जागेवर जाऊन केल्यानंतर जर तेथे वीज वापराबाबत कोणतीही अनियमितता दिसून आली तर त्या वीज ग्राहकावर किंवा वीज वापर करणाऱ्या संबंधितावर विद्युत कायदा अधिनियम २००३ अन्वये कार्यवाही करण्यात येते.

मे. टाटा पॉवर व्दारा चोरी प्रवण क्षेत्रामध्ये/ भागात वारंवार छापे टाकले जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील कोळीवाडे व गावठाण येथे एसआरए योजना राबविण्याबाबत

**(६) ४५४८२ (३१-१०-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिवडी, सायन, देवनार यासोबत अन्य काही कोळीवाड्यांमध्ये एसआरए प्रकल्प राबविण्यास कोळी समाजाने विरोध केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोळीवाडे आणि गावठाण येथे एसआरए प्रकल्प राबविण्यात येणार नसल्याचे शासनाने जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पांना शासनाकडून स्थगिती देण्यात येऊनही विकासकांकडून मनमानी सुरु आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार विकासकांकडून होणारी मनमानी थांबविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२७-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत सदर कोळीवाडे व गावठाण यांच्या सिमा व हद्दी जोपर्यंत सक्षम प्राधिकरण यांचेमार्फत निश्चित होत नाही, तोपर्यंत या जागेवरील कोणतीही योजना स्वीकारली जाऊ नये, असे दि.०५.०४.२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने यंत्रणेतील सर्व संबंधितांना सूचित केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माहीम मुंबई येथील विश्वकर्मा भुवन या म्हाडाने संपादित केलेल्या इमारतीच्या दुरुस्ती व पुनर्विकासाबाबत**

**(७) ४५६६९ (३१-१०-२०२२). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहीम मुंबई येथील विश्वकर्मा भुवन ही इमारत म्हाडाने ३० वर्षापूर्वी पुनर्विकासासाठी संपादित करुनही अद्याप सदर इमारतीचा पुनर्विकास झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारत धोकादायक झाली असून पुनर्विकासाठी संपादित केल्यामुळे घर दुरुस्ती मंडळातर्फे इमारतीची दुरुस्तीही केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर धोकादायक इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत तसेच पुनर्विकास प्रक्रिया सत्वर राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०१-११-२०२३) :** (१) अंतिम भूखंड क्रमांक ९६९, टीपीएस-IV माहिम विभाग, शंकर घाणेकर मार्ग, दादर, मुंबई २८ ही मालमत्ता पंचाल-मय-ब्रम्ह समाज, (पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. एफ-३५०) यांच्या मालकीची आहे. (एकूण क्षेत्रफळ ६६७.९० चौ.मी.) सदर मालमत्तेवर २ उपकरप्राप्त इमारती अस्तित्वात होत्या. परंतू त्यापैकी ०१ तळमजल्याची उपकरप्राप्त इमारत ही सन १९६९ साली मोडकळीस आलेली असल्याने कोसळलेली होती व त्या इमारतीमधील १० पैकी ९ भाडेकरु/रहिवाश्यांना मंडळाने संक्रमण शिबीरात स्थलांतरीत करण्यात आले. सद्य:स्थितीत दुसरी इमारत तळ+ ३ मजल्याची असून, जागेवर उभी असून, त्यामध्ये १२ भाडेकरु / रहिवाशी राहतात. मंडळाने सदर मालमत्तेवरील कोसळलेल्या इमारतीचे म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम ४१ (१) अन्वये भूसंपादन करण्याचा सादर केलेल्या प्रस्तावास शासनाने दि.१३.०५.२०१० रोजी मान्यता दिली होती (क्षेत्र २५४.२३ चौ.मी.). सदरहू मालमत्तेच्या मालकांनी भूसंपादनास आक्षेप नोंदविला होता.

भूखंडाचे मालक पंचाल-मय-ब्रम्ह समाज, मुंबई यांनी त्यांच्या दि.२८.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मंडळास असे कळविले आहे की, त्यांच्या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी धर्मादाय आयुक्त, मुंबई विभाग यांनी एमपीटी अधिनियमातील कलम ३६ (१) (अ) मधील तरतुदीनुसार दि.१२.०४.२०२३ रोजीच्या आदेशान्वये सदर मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी मेसर्स वेट्रोशा इन्फ्रा इंडिया प्रा. लि. यांच्यातर्फे करण्यासाठी मान्यता दिली आहे. तसेच मालकाच्या वतीने त्यांचे वकील यांनी दि. २६.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनाने म्हाड कायद्यातील १९७६ च्या कलम ४१ (१) अंतर्गत दि. १३.०५.२०१० रोजी मंजूर केलेला भुसंपादनाचा (एकूण ६६८.९० चौ.मी. पैकी २५४.२३ चौ.मी. भूखंड) प्रस्ताव रद्द करण्याची विनंती केली आहे.
(२) व (३) विश्वकर्मा भुवन ही इमारत सन १९६९ मध्ये कोसळल्यामुळे सदर इमारतीच्या दुरुस्तीचा प्रश्न उद्भवत नाही. म्हाडाने अहवालात नमुद केले आहे की, भूसंपादित केलेला भुखंड (२५४.२३ चौ.मी) अतिशय अरुंद असून, विकास

नियंत्रण नियमावली २०३४ नुसार सदर भुखंडावरील विश्वकर्मा भुवन या इमारतीचा स्वतंत्रपणे पुनर्विकास करणे व्यवहार्य होणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील रेल्वेच्या अखत्यारी असलेल्या जमीनीवर झोपड्यांचे एसआरए योजनेंतर्गत पुनर्वसन करण्याबाबत

**(८) ४७९३१ (३१-१०-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील पूर्व-पश्चिम उपनगरातील रेल्वेच्या जमीनीवरील सन २०११ पर्यंतच्या अतिक्रमित संरक्षित झोपडीधारकांचे सन २०१८ च्या शासन निर्णयानुसार एसआरए योजनेअंतर्गत पुनर्वसन करण्यासाठी केंद्र सरकरला प्रस्ताव पाठवून मान्यता घेण्याबाबत राज्य शासनाने दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास आयोजित केलेल्या रेल्वे प्रशासन अधिकारी बैठकीत निर्देश दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीतील निर्णयानुसार रेल्वेचे प्रशासकीय अधिकारी आणि राज्य शासनाचे संबंधित अधिकारी यांनी याबाबत संयुक्त कार्यवाही करुन आजपर्यंत कोणती कार्यवाही केली आहे,
(३) असल्यास, याबाबत किती निश्चित कालावधीत रेल्वेच्या जमीनीवरील व लगतच्या झोपडीधारकांचे एसआरए योजनेतर्गत पुनर्विकास प्रकल्प राबवून पुनर्वसन करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन सदर झोपडपट्टी पुर्नवसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२७-०९-२०२३) :** (१) व (२)
रेल्वेच्या मालकीच्या जमिनीवरील झोपडपट्टयांचे पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने तत्कालीन मा.मंत्री (गृहनिर्माण) यांच्याकडे दि.२०.०२.२०२२ रोजी रेल्वे अधिकाऱ्यांसोबत बैठक पार पडली. सदर बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार रेल्वेच्या जागेवरील झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या रेल्वे विभागास दि.२३.०३.२०२२ व दि.२१.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार रेल्वे विभागास पुढील २ पर्याय देण्यात आले आहेत :-
१) रेल्वेच्या जागेवरील झोपडीधारकांच्या पुनर्वसनासाठी केंद्र शासनाने ना-हरकत प्रमाणपत्र द्यावे.
अथवा
२) सदरहू झोपडीधारकांचे पुनर्वसन प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत स्वत: रेल्वे विभागाने करावे.
(३) रेल्वेची जमीन ही केंद्र शासनाच्या मालकीची असल्यामुळे केंद्र शासनाकडून परवानगी मिळाल्याशिवाय सदर जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविता येत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील साने गुरूजी मार्गावरील इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(९) ४८४४० (२५-०९-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील साने गुरूजी मार्गावरील शिंदे चाळीतील इमारत क्रमांक १४५ डी, १४५ ई, १४५ एफ, १४७-१५१, १५३-१५५, बोहरी चाळीतील इमारत क्रमांक १२७-१२९, पानबाई निवास येथील इमारत क्रमांक १३१-१३३, मोतीवाणी चाळीतील इमारत क्रमांक १३७-१४१ व पानसरे चाळीतील इमारत क्रमांक १४५, १४५ अे, १४५बी, १४५सी, १४५जी या इमारतींचा पुनर्विकास प्रकल्प गेल्या ४५ वर्षांपासून भूसंपादनाच्या प्रक्रियेस विलंब होत असल्याचे कारणास्तव प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपमुख्य अभियंता/परिमंडळ-३, दु.व पु. मंडळ यांचेमार्फत उक्त मिळकतींच्या भूसंपादनाच्या प्रस्तावांची सविस्तर छाननी करुन सदर प्रस्ताव दि.१३ जून,२०१९ रोजी पुढील कार्यवाहीस्तव गृहनिर्माण विभागाकडे पाठविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती म्हाडा अधिनियम १९७६ अन्वये सदरहू प्रस्तावांमधील नमूद इमारतींपैकी कोणकोणत्या इमारतींच्या भूसंपादनाची प्रक्रिया पुर्ण करुन पुनर्विकासाची कामे सत्वर सुरु करण्याबाबत तसेच उक्त प्रकरणी विलंब करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०१-११-२०२३) :** (१), (२) व (३)

इमारत क्र. १४५ एफ शिंदे चाळ, साने गुरूजी मार्ग व लगतच्या इ. क्र. १४५डी, १४५ई, १५३-१५५, ४३९सी, ४३९डी, १४५एफ, १४५जी, १४५एफएफ, १४७-१५१, १५३-१५५, ४३९ व ४३९ अब या इमारतींच्या संयुक्त पुर्नबांधणी योजनेकरीता भूसंपादनाची प्रक्रिया मंडळाने सन १९८० मध्ये सुरु झाली होती. तथापि, प्रत्यक्ष ताबा घेण्यापूर्वी इ.क्र.१४५ एफ, इमारतीचे मालक श्रीमती शिंदे यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका क्र.१३११/८३ अन्वये भूसंपादन प्रक्रियेस आव्हान दिले होते. त्यामध्ये म्हाडा अधिनियम ८८ (३)(ब) अन्वये दिलेले प्रमाणपत्र रद्द ठरवून भूसंपादन प्रक्रिया पुनश्चः करण्याचे आदेश दिले. त्यानुसार मंडळाच्या दि. २७.०९.१९९३ रोजीच्या बैठकीद्वारे भूसंपादनास मान्यता दिलेली आहे.

मंडळाने दि.१२.१०.२०१८ व दि.०१.०३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये वास्तुशास्त्रज्ञ यांची भुकर पाहणी क्र. २०५४, २०५५, २०५६, २०५८, १/२०५८, २/२०५८, २०५९, १/२०५९, २०६०, २०६१, १/२०६१, २/२०६१, ३/२०६१, २०६२, २०६३, २०६४, २०६५, भायखळा विभाग या मालमत्तांच्या संयुक्त पुनर्विकास योजना राबविण्यासाठी व्यवहार्यता अहवाल तयार करण्यासाठी नेमणूक केली आहे. सदरहू वास्तुशास्त्रज्ञ यांच्या दि.१८.१०.२०२१ रोजीच्या अहवालामध्ये त्यांनी, DCPR २०३४ मध्ये सर्व भूखंड हे निवासी क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. परंतू भूकर पाहणी क्र. २०५८ व २०५९ या भूखंडावर RG आरक्षण दर्शविले असून संयुक्त पुनर्विकास योजना व्यवहारिक दृष्टया योग्य असल्याचे नमुद केले आहे परंतु RG आरक्षण हे भुकर पाहणी क्र. २०५८ व २०५९ ऐवजी १/२०५६ या भूखंडावर हलविल्यास विकास नियंत्रण नियमावली ३३(९) अंतर्गत अनुज्ञेय असलेला संपूर्ण चटई क्षेत्र निर्देशांक वापरणे शक्य होईल असे नमूद केले आहे. सदर योजनेअंतर्गत भुकर पाहणी क्र. २०५४, २०५५, २०५६, २०५८, १/२०५८, २/२०५८, २०५९, १/२०५९, २०६०, २०६१, १/२०६१, २/२०६१, ३/२०६१, २०६२, २०६३, २०६४, २०६५, भायखळा विभाग व यावरील इमारतींचा समावेश संयुक्त पुनर्विकास योजनेमध्ये करण्यात आला आहे. सदर योजनेअंतर्गत एकूण ६७४ निवासी + ५२ अनिवासी असे एकूण ७२६ भाडेकरु / रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित केले आहे.
या समूह विकास योजनेअंतर्भुत एकूण १४ भुखंडापैकी ३ भुखंडांचे भूसंपादन करण्यात आले आहे. उर्वरित ११ भुखंडांचे भुसंपादन करण्याकरिता वास्तुशास्त्रज्ञ यांनी दि. २५/०५/२०२३ रोजी सादर केलेल्या व्यवहार्यता अहवाल (Feasibility Report) प्रस्ताव सुधारीत करुन फेरसादर करण्याची कार्यवाही मंडळाकडून करण्यात येत आहे. तद्नंतर शासनाची भूसंपादनाकरीता मान्यता घेवून पुनर्विकासाचे काम सुरु करता येईल
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील ई.डी. चौकशीत अडकलेल्या विकासकाकडून झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे प्रंलबित काम पूर्ण करण्याबाबत

**(१०) ४९६७७ (२९-०१-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) चौकशीत अडकलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या प्रलंबित ६८ योजना विकासकाकडून काढून घेतल्याचे निर्णय दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना शासनाने काढून घेण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त योजना तातडीने मार्गी लावून तातडीने पूर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. अतुल सावे (२७-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.

तर सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) कारवाईमुळे जवळपास वीस (२०) झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रलंबित आहेत. तथापि, सदर योजना संबंधित विकासकांकडून काढून घेण्याचा निर्णय अद्याप तरी शासनाने घेतलेला नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) तथापि, मुंबईतील रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना गती देण्यासाठी दि.२७.०८.२०२१ रोजी आढावा बैठक पार पडली. सदर बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार ई.डी. च्या कारवाईमुळे ज्या योजना रखडलेल्या आहेत, त्या योजनांमधील किमान पुनर्वसन घटकाचे बांधकाम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत शासन स्तरावरुन ई.डी. कार्यालयाशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत मोठ्याप्रमाणत वीजचोरी होत असल्याबाबत

**(११) ५२४६० (१९-०१-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत बेस्ट, टाटा, अदानी या कंपन्या वीज पुरवठा करीत असून वीज चोरीच्या प्रमाणात वाढ झाली असल्याने कंपन्याच्या दक्षता पथकांनी मुंबईच्या विविध पोलीस ठाण्यात वीज चोरीच्या तक्रारी दाखल करण्यात आल्याचे दिनांक १०ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इमारतीच्या बांधकामासाठीही अनधिकृत जोडणी करून वीज वापरली जाते हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वीज चोरी प्रकरणी मुंबईतील विक्रोळी, शिवाजी नगर, सहार, नेहरु नगर, मानखूर्द व कांदिवली या पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वीज कंपन्या कडून अव्वाच्या सव्वा देण्यात येणारी वीज बिले कोरोना, लॉकडाऊनमुळे त्रस्त नागरीक यामुळे वीज चोरी होत असल्याचे बोलले जात असणे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली, वा करण्यात येत आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) मे. अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई लिमिटेड च्या कार्यक्षेत्रातील पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(४) वीज ग्राहकांना वितरित करण्यात येणारी वीज देयके त्याच्या वास्तवितक वीज वापराच्या प्रमाणात व मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने मान्यता दिलेल्या दर पत्रकानुसारच आकारण्यात येते.

---

## एक एकरवरील पुनर्विकासात म्हाडा यापुढे अधिमुल्याऐवजी घरेच स्वीकारणार असल्याबाबत

**(१२) ५३४५५ (२९-०१-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एक एकरवरील पुनर्विकासात म्हाडा यापुढे अधिमुल्याऐवजी घरेच स्वीकारणार असल्याचा निर्णय सरकारने घेतला असल्याचे माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरे किंवा अधिमुल्य घेण्याचा निर्णय माहे ऑगस्ट २०२१ रोजी करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हा निर्णय अंतिम नसतानाही म्हाडाने काही प्रकल्पात घराऐवजी अधिमुल्य स्वीकारण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली असून आतापर्यंत किती घरांना मंजुरी दिली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०४-१०-२०२३) :**(१) व (२)

बृन्हमुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ मधील विनियम ३३(५) मध्ये संस्थेच्या भूखंडाचे क्षेत्रफळ ४,००० चौ.मी. पेक्षा अधिक असल्यास व लगत १८ मी. वा त्यापेक्षा अधिक रूंदीचा रस्ता उपलब्ध असल्यास ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय असून संस्थेला सदर ३.०० च.क्षे.नि. वरील उर्वरित १.०० च.क्षे.नि. चे वितरण गृहसाठा हिस्सेदारी तत्वावर शासनाची पूर्व परवानगी घेऊन वितरीत करण्याची तरतुद करण्यात आली होती.

नगर विकास विभागाच्या दि.१८.०८.२०२१ रोजीच्या अधिसूचनेन्वये, सदर ४.०० च.क्षे.नि. मधील ३.०० च.क्षे.नि. वरील १.०० च.क्षे.नि. चे वितरण करतांना शासनाची पूर्व परवानगी घेऊन संस्था/विकासक यांना गृहसाठा हिस्सेदारी तत्वावर किंवा अधिमुल्य तत्वावर असे दोन पर्याय उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.
(३) नगर विकास विभागाच्या उक्त अधिसूचनेमध्ये, “प्रस्तावित फेरबदलास शासन मान्यता प्रलंबित असेपर्यंत प्रस्तावित फेरबदल लगोलग अंमलात येईल,” असे नमुद आहे. त्यानुसार आतापर्यंत तीन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या ३.०० च.क्षे.नि. वरील १.०० च.क्षे.नि. अधिमुल्य तत्वावर वितरित करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिवा शहरासाठी नवीन स्वतंत्र पोलीस स्टेशनची निर्मिती करण्याबाबत

**(१३) ५३९३२ (२४-०१-२०२३). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महापालिका क्षेत्रातील दिवा शहर व परिसरातील गावांमधील लोकसंख्यमध्ये दिवसेंदिवस प्रचंड प्रमाणावर वाढ सुरूच असून सद्यस्थितीत दिवा शहर व परिसरातील गावे मुंब्रा पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंब्रा पोलीस स्टेशनमध्ये २० ते २५ पोलीस कर्मचारी यांच्यावर कायदा सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असून वाढत्या लोकसंख्येमुळे या परिसरात खून, चोऱ्या, दरोडे, महिलांवर अत्याचार व विनयभंग, फसवणूक करण्याचे समाजविघाटक प्रमाणात वाढ होत असल्याने मुंब्रा पोलीस ठाण्याचे विभाजन करून दिवा शहर व परिसरातील गावांसाठी नवीन स्वतंत्र अद्यावत व सुसज्ज पोलीस स्टेशनची विनाविलंब निर्मिती करण्यात यावी, म्हणून तेथील नागरिकांची, सार्वजनिक संस्थांची ,व्यापारी वर्गांची तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०१३ पासून सातत्याने लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय
(३) असल्यास, सदरहू मागणीनुषंगाने पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर यांनी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील मुंब्रा पोलीस ठाण्याचे विभाजन करून दिवा येथे नवीन स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव क्र.हा.आ./प.शा.२(४२५)/ दिवा/१४१५/१३ दिनांक २० ऑगस्ट, २०१३ अन्वये मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून नमूद पोलीस ठाणे निर्माण होण्याकरिता पत्र क्रमांक कोमसं/२६अ/४७/अती पदनिर्मिती/२८/२०१५ दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ अन्वये शासनास सादर केलेला प्रस्ताव आजमितीस शासनाकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रस्तावास शासनाची विनाविलंब मंजुरी होऊन दिवा शहरासाठ नवीन पोलीस स्टेशन कार्यान्वित व्हावे यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन गृहमंत्री यांना दि.१३ जानेवारी २०२१ रोजी व तदनंतर पुन्हा दि.१६ जून २०२१ रोजी तसेच विद्यमान उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २० ऑगस्ट, २०२२ रोजी लेखी पत्र पाठवून तातडीने मान्यता देण्यात यावी म्हणून मागणी केली आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदरहू प्रस्तावास शासनाची तत्काळ मान्यता मिळून विनाविलंब नवीन स्वतंत्र पोलीस स्टेशनची निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०२३) :**(१) (२) (३) (४) व (५)

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील मुंब्रा पोलीस ठाणेचे विभाजन करून दिवा येथे नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेल्या पदनिर्मितीच्या प्रस्तावामध्ये दुसऱ्या टप्प्यात प्रस्तावित केले होते. त्याबाबत वित्त विभागाने प्रथम पदांचा आढावा व सुधारित आकृतीबंध मंजूर करणेबाबतचे निर्देश दिले होते.त्यानुषंगाने पोलीस ठाणे,दिवा करीता स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करणेबाबत पोलीस महासंचालक कार्यालयास कळविण्यात आले होते.

दरम्यानच्या कालावधीत वित्त विभागाच्या उक्त निर्देशानुसार पोलीस महासंचालक कार्यालय यांचेसह एकूण ७० पोलीस घटक कार्यालयांचा सुधारित आकृतीबंध अंतिम करणेबाबत कार्यवाही सुरू असून, आकृतीबंधाच्या प्रस्तावास टप्प्या-टप्प्याने वित्त विभाग, उपसमिती यांचे मान्यतेनंतर मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीने अनुक्रमे दि.१३/१२/२०२२ व दि.६/३/२०२३ व्दारे आयोजित बैठकीत मान्यता दिली आहे. त्यानुसार काही पोलीस घटकांचे शासन निर्णय निर्गमित झाले असून काही घटकांचे शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

नियोजित दिवा पोलीस ठाणेच्या बांधकामाकरीता भूखंड व संमतीपत्रक उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हाधिकारी,ठाणे व आयुक्त,ठाणे महानगरपालिका यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आला असून,सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्याची तजविज ठेवली असल्याचे पोलीस आयुक्त,ठाणे शहर यांनी कळविले आहे.

म्हणून, स्वतंत्र सुधारित प्रस्ताव शासन स्तरावर प्राप्त झाल्यानंतर वित्त विभागाच्या मान्यतेने पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**औरंगाबाद येथील प्रधानमंत्री आवास योजनेसाठी राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत झालेला**

**(१४) ५४७९५ (२७-०१-२०२३). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील प्रधानमंत्री आवास योजनेसाठी राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेची चौकशी करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करण्याकरिता चौकशी समिती नेमली आहे काय, असल्यास किती कालावधीत चौकशी अहवाल सादर करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०५-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

छत्रपती संभाजी नगर, महानगर पालिकेमार्फत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत निविदा प्रक्रियेची चौकशी करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे.

(२) सदर निविदा प्रक्रियेबाबत विविध स्तरावरुन तक्रारी प्राप्त झाल्याने निविदा धारकांनी निविदेसोबत सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी व मुल्यमापन करण्याकरीता महानगरपाकिलेने चौकशी समिती नियुक्त केली.

(३) छत्रपती संभाजी नगर, महानगर पालिकेमार्फत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत निविदा प्रक्रियेबाबत विविध स्तरावरुन तक्रारी प्राप्त झाल्याने दिनांक ०५.१२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांचे अध्यक्षतेखाली प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत औरंगाबाद येथील प्रकल्पांसाठी चौकशी समिती गठित करण्यात आली आहे.

सदर समितीने सादर केलेल्या अहवालानुसार कार्यवाही करणेबाबत आवश्यक त्या सूचना शासनस्तरावरून निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**मंगलमुर्ती इमारत, राजाभाऊ देसाई मार्ग, प्रभादेवी, मुंबई या पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीच्या दुरुस्ती व पुनर्विकासाबाबत**

**(१५) ५४८०२ (२९-०१-२०२३). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत सन १९७०-८० मध्ये प्रभादेवी मुंबई येथे बांधाण्यात आलेली मंगलमुर्ती इमारत जीर्ण झाल्याने इमारत सद्या धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रचलित नियमात बसत नसल्याने या इमारतीसाठी निधी उपलब्ध नसल्याने म्हाडा किंवा अन्य कोणत्याही शासन यंत्रणेकडून या इमारतीची दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन इमारतीच्या विशेष दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०५-१०-२०२३) :**(१), (२) व (३) मंगलमुर्ती इमारत, प्रभादेवी, मुंबई ही इमारत पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत सन १९९१ मध्ये मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने बांधली आहे. सदर इमारतीचे लेखापरिक्षण सन २०१५ मध्ये करण्यात आलेले असून मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत सदर इमारतीची विशेष दुरुस्ती करण्यात आली असून इमारत सुस्थितीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कारागृह कर्मचाऱ्यांच्या किरकोळ रजा वाढवणे तसेच रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१६) ५५१८८ (२५-०१-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलिस कर्मचाऱ्यांच्या किरकोळ रजांची संख्या १२ वरून २० करण्यासंदर्भात शासनाने माहे मार्च २०२२ मध्ये निर्णय घेतला असला तरी कारागृह विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या किरकोळ रजा अद्यापही वाढविण्यात आल्या नसल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास,पोलीस कर्मचाऱ्यांप्रमाणे कारागृह कर्मचाऱ्यांच्या किरकोळ रजा वाढवण्यासांदर्भात तसेच शासनाने सन २००४ मध्ये पोलीस प्रशासन व कारागृह प्रशासनास समकक्ष आणले असले तरी दोन्ही विभागाच्या काही पदांची वेतनश्रेणी समान नसल्याने सदरील पदांची वेतनश्रेणी समान करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, राज्यातील तुरुंगाच्या कैदी क्षमतेपेक्षा दोन ते तीन पट अधिक असलेली कैद्यांची क्षमता लक्षात घेता कारागृह विभागातील रिक्त पदांची भरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-११-२०२३) :** (१) व (२) पोलीस विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय असणारे लाभ आवश्यकतेनुसार कारागृह विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांना लागू करणेबाबत निर्णय घेण्यासाठी शासन निर्णय दि.२६ एप्रिल, २०१६ अन्वये सक्षम असलेली समिती अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली आहे. कारागृह विभागाच्या कर्मचाऱ्यांना २० दिवस किरकोळ रजा अनुज्ञेय करणेबाबत तसेच

कारागृह हवालदार या पदावरील कर्मचाऱ्यांना पोलीस हवालदार या समकक्ष पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ काल्पनिकरित्या मिळणेबाबत प्रस्ताव शासनास प्राप्त झाले होते. तथापि, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सुधारित प्रस्ताव सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. सुधारित प्रस्ताव प्राप्त होताच शासनस्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) राज्यातील तुरुंगात कैदी क्षमतेपेक्षा दोन ते तीन पट अधिक असलेली कैद्यांची क्षमता लक्षात घेता कारागृह विभागाकरीता नवीन २००० पद निर्मितीस मा.मंत्रीमंडळाच्या दि.०३.०८.२०२३ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.
कारागृह विभागाच्या आस्थापनेवरील वेगवेगळया संवर्गातील सध्या रिक्त असलेली गट-क व ड मधील सरळसेवेची पदे भरण्याकरीता टि.सी.एस. या कंपनीची निवड करण्यात आली असून कंपनीसोबत करारनामा करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. सदर पदांची बिंदुनामावली तयार करण्याची कार्यवाही अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेस्तरावर सुरु असून बिंदूनामावली पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त होताच अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून भरती प्रक्रिया सुरु करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (एसआरए) झोपू प्रकल्पातील विकासकाकडून रहिवाश्यांना देय असलेल्या घरभाड्याची रक्कम थकीत असल्याबाबत

**(१७) ५६५१८ (२७-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पातील १५० विकासकांनी प्रकल्पातील झोपडीधारकांचे सुमारे ६१९ कोटी रुपये घरभाडे थकीत ठेवल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०२३ वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित विकासकांनी एका महिन्याच्या आत थकीत रक्कम न भरल्यास त्यांच्या विक्री घटकातील इमारतीचे बांधकाम थांबविण्याबाबत निर्णय माहे जानेवारी, २०२३ मध्ये घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पांतील झोपडीधारकांचे थकीत घरभाडे रक्कम झोपडीधारकांना तातडीने उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने शासन अथवा प्राधिकरणातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन झोपडीधारकांना थकबाकीसह घरभाडे रक्कम अदा करणेबाबत तसेच संबंधित विकासकांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२७-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) घरभाडे थकविणाऱ्या तसेच प्रकल्प रखडविणाऱ्या विकासकावर प्राधिकरणामार्फत नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच
(१) भाडे देण्याचे आदेश.
(२) विक्री घटकाचे बांधकामास स्थगिती, आणि
(३) विकासकास १३(२) अन्वये सदर योजनेतून दूर करणे या कार्यवाही सध्या करण्यात येतात.

विकासकाची तांत्रिक व आर्थिक क्षमतेनुसार शासन मान्यतेने नामिकासुची (Empanelment) जारी करण्यात आली आहे. अशा रखडलेल्या योजनांकरिता निविदा प्रक्रियेद्वारे विकासकाची नेमणूक करुन योजना मार्गी लावण्यात येणार आहेत.

तसेच निविदा प्रक्रियेद्वारे विकासकाची निवड झाल्यास विकासकाने ३ वर्षात योजना पूर्ण करणे बंधनकारक असून सदरहू ३ वर्षापैकी २ वर्षाचे आगाऊ भाडे विकासक संबंधित योजनेतील पात्र झोपडीधारकांना प्रथमत: अदा करेल. तसेच पुढील १ वर्षाच्या भाड्यापोटी पुढील तारखेचे धनादेश (PDC) प्राधिकरणाकडे जमा करणे आवश्यक आहे.

(४) यासंदर्भात आजतागायत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे:-

१. ३१ योजनांमध्ये विकासकाचे विक्री घटकातील बांधकाम थांबविले आहे.

२.१२ योजनांमध्ये कलम १३(२) अन्वये विकासकाची नियुक्ती रद्द केली आहे.

३.७ योजनांमध्ये कलम १३(२) अन्वये विकासका विरुध्द कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

४.१०० योजनांमध्ये विकासकास भाडे अदा करण्याबाबत नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजने अंतर्गत मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांना लाभ मिळणेबाबत

**(१८) ५६६७१ (३०-०४-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी फायदा व्हावा म्हणून मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना सुरु केलेली असून या योजनेमध्ये केवळ ज्या शेतकरी बांधवांना कृषी पंपासाठी वीज पुरवठा केलेला नाही अशा शेतकऱ्यांना लाभ दिला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा लाभार्थ्यांची संख्या मंजूर वाटपाच्या अनुदानाच्या तुलनेत अतिशय कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेमध्ये लाभार्थी घटकात बदल करून शेती पंपासाठी जो शेतकरी मागणी करेल त्या शेतकऱ्याला उक्त योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२३) :** (१) होय. शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे याकरिता शासनाने दि. १५ नोव्हेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्यात टप्प्याटप्प्याने १,००,००० लक्ष सौर कृषीपंप आस्थापित करण्याची "मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना" सुरु केली. त्यातील पहिल्या टप्प्यात २५,००० नग सौर कृषी पंप आस्थापित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. पहिल्या टप्प्यात शेतकऱ्यांचा भरघोस प्रतिसाद पाहता शासन निर्णय दि. ११ सप्टेंबर २०१९ अन्वये मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना टप्पा २ व ३ एकत्रित जाहिर करण्यात आली. सदर योजनेअंतर्गत ज्या शेतकऱ्यांकडे वीज जोडणी नाही व पाण्याचा स्त्रोत उपलब्ध आहे, अशा शेतकऱ्यांना सौर कृषी पंपाचे वाटप करण्यात आले. सदर योजनेअंतर्गत १,००,००० लक्ष नग सौर कृषी पंप आस्थापित करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे.

(२) मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेअंतर्गत शासन निर्णयानुसार लाभार्थ्यांचे उद्दिष्ट व त्यानुसार अनुदान मंजूर करण्यात आले होते. सदर मंजूर उद्दिष्टाप्रमाणे सौर कृषी पंप आस्थापित करण्यात आले आहेत.

(३) राज्यात दि. १२.०५.२०२१ च्या शासन निर्णयानुसार कुसुम घटक "ब" अंतर्गत पहिल्या वर्षात १,००,००० पारेषण विरहित सौर कृषीपंप असे एकूण ५ वर्षात ५,००,००० कृषीपंप आस्थापित करण्यात मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी महाऊर्जाद्वारे करण्यात येत आहे.

ज्या शेतकऱ्यांनी वीज जोडणी साठी पैसे भरले आहेत. परंतू अद्यापि त्यांना वीज जोडणी मिळालेली नाही, अशा शेतकऱ्यांसाठी शासन निर्णय दि. ०९.०१.२०२३ अन्वये कुसुम योजनेच्या घटक ब अंतर्गत १,००,००० पारेषण विरहित सौर कृषी पंप आस्थापित करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी महावितरण कंपनीमार्फत करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार शहरातील गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शहरात ठिकठिकाणी सी.सी.टी.व्ही कॅमेरा बसवण्याबाबत

**(१९) ५६८१० (३०-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि विविध गुन्ह्यातील आरोपींचा माग घेण्यासाठी वसई-विरार शहरातील प्रमुख महत्वाच्या ठिकाणी, मुंबई- अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वसई-नालासोपारा-विरार फाटा इत्यादी ठिकाणी सी.सी.टी.व्ही कॅमेरा बसवण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या विरार येथील पदाधिकाऱ्याने दिनांक १६ ऑगस्ट, २०२२ रोजी आणि त्यानंतर पुन्हा दिनांक २६ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास एका सविस्तर लेखी निवेदनाद्वारे मा. उपमुख्यमंत्री यांच्याकडे केली , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणत्या स्वरूपाची कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०२३) :**(१) व (२) मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे अंतर्गत वसई-विरार शहरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि विविध गुन्ह्यातील आरोपींचा माग घेण्यासाठी, जनतेच्या सुरक्षिततेसाठी एक कॅमेरा या उपक्रमांतर्गत वसई-विरार शहरातील प्रमुख महत्वाच्या ठिकाणी, मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वसई-नालासोपारा-विरार फाटा, कन्हेर फाटा, शिरसाठ फाटा, खराडतारा, वज्रेश्वरी रोड, या मुख्य नाक्यांवर लोकसहभागातून खाजगी विभाग ४५९० तसेच सरकारी विभाग १३०८ असे एकूण ५८९८ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्यात आलेले आहेत. तसेच काही कॅमेरे हे रोड फेसींग करण्यात आलेले आहेत. तसेच यापुढेही लोकसहभागातून जास्तीत जास्त सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्याची तजवीज ठेवली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाटोदा (ता.येवला, जि.नाशिक) येथे १३२/३३ केव्ही अतिउच्च दाब उपकेंद्र निर्माण करण्याबाबत

**(२०) ५६९३६ (३०-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटोदा( ता.येवला, जि.नाशिक) येथे १३२/३३ केव्ही अतिउच्च दाब उपकेंद्र निर्माण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी २०२३ व दिनांक १२ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्या सुमारास मा.उपमुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील पाटोदा (ता.येवला, जि.नाशिक) येथे अतिउच्च दाब विद्युत उपकेंद्र निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीने महापारेषणला माहे सप्टेंबर २०२२ मध्ये प्रस्ताव पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मनमाड व येवला सबस्टेशन मधून वळवल्या जाणाऱ्या विद्यमान आणि प्रस्तावित ३३ केव्ही सबस्टेशनच्या लोडचा विचार करता तांत्रिक दृष्ट्या १३२ केव्ही पाटोदा उपकेंद्राची उभारणी व्यवहार्य व आवश्यक असल्याचे महावितरणने महापारेषणला कळवले आहे,हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील अतिउच्च दाब उपकेंद्रासाठी पिंपरी ता.येवला येथे ग्रामपंचायतीने मोफत जागा उपलब्ध करून दिली असून ही जागा तांत्रिकदृष्ट्या योग्य आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रश्न भाग (१), (२), (३) व (४) च्या अनुषंगाने पाटोदा जि.नाशिक येथे १३२/३३ केव्ही अतिउच्च दाब उपकेंद्र निर्माण करण्यासाठी महापारेषणने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०२३) :**(१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महावितरणने असा प्रस्ताव महापारेषण कंपनीकडे पाठविला नाही.

(३) हे खरे नाही. महावितरणच्या नाशिक परिमंडळांतर्गत मालेगाव मंडळातील येवला तालुक्याला महापारेषणच्या १३२/३३ के.व्ही. येवला (१०० एम.व्ही.ए) व २२०/१३२/३२ के.व्ही. मनमाड (१२५ एम.व्ही.ए) या दोन अति उच्चदाब केंद्रातून सतरा ३३ के.व्ही. वीज वाहिन्याद्वारे वीज पुरवठा सुरळीतपणे होत असल्याने सद्यस्थितीत १३२/३३ पाटोदा येथे नवीन अतिउच्च दाब उपकेंद्राची आवश्यकता नाही.

(४) सद्यस्थितीत पाटोदा उपकेंद्राची आवश्यकता नसल्याने तांत्रिकदृष्ट्या जागेच्या योग्यतेच्या तपासणीची आवश्यकता नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात होत असलेल्या वीज चोरीबाबत

**(२१) ५६९६४ (३०-०४-२०२३). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संग्राम थोपटे (भोर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणच्या सुरक्षा आणि अंमलबजावणी विभागाने डिसेंबर २०२२ या एका महिन्यात केलेल्या धडक कारवाईत राज्यात वीज चोरीच्या ८७९ प्रकरणांत ११ कोटी ६९ लाख रुपयांची वीजचोरी उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज चोरीशिवाय इतर अनियमितता असलेल्या एकूण ५३९ प्रकरणांमध्ये १३ कोटी ६७ लाख ६० हजार रुपयांची वीजदेयकेही देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन राज्यातील वीज चोरीच्या प्रकरणात संबंधीत दोषींविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, भविष्यातील वीज चोरी रोखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

महावितरण मधील सुरक्षा व अंमलबजावणी (सुवअं) विभागामार्फत माहे डिसेंबर-२०२२मध्ये ८७९ ग्राहकांच्या ठिकाणी ११ कोटी ६९ लाख रुपयांची वीजचोरी उघडकीस आणण्यात आली आहे.

(२) होय अंशत: खरे आहे.
महावितरणव्दारे माहे डिसेंबर-२०२२ मध्ये वीज चोरी व्यतिरिक्त इतर अनियमितता असलेल्या एकूण १५३४ प्रकरणांमध्ये रु. १९.३८ कोटीची वीजदेयके देण्यात आली आहे.
(३) वीज चोरी प्रकरणातील सर्व ग्राहाकांना विद्युत अधिनियम, २००३ च्या तरतूदीनुसार वीज चोरीचे दंडात्मक देयक देण्यात येतात. सदर देयकाचा भरणा केल्यास संबंधीत वीजग्राहक/ वापरकर्ते यास वीजचोरीमुळे होणारी पोलीस कारवाई टाळण्याकरीता संधी देण्यात येऊन वीजचोरी प्रकरणामध्ये तडजोड रकमेचे देयक देण्यात येते. सदर तडजोड रकमेचा भरणा न केल्यास अशा वीजवापरकर्त्या विरुध्द विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदी नुसार पोलीस स्टेशनमध्ये वीजचोरीचा गुन्हा नोंदविण्यात येते. अशाप्रकारे माहे डिसेंबर २०२२ मध्ये उघडकीस आणलेल्या वीजचोरी प्रकरणांपैकी एकूण ९० प्रकरणांमध्ये पोलिस विभागामार्फत तपास करुन पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येते.
(४) वीजचोरी थांबविण्यासाठी उपाययोजना म्हणून महावितरणतर्फे वेगवेगळया पातळीवर वेळोवेळी विशेष तपासणी मोहीम राबवून विजचोरांविरुध्द कारवाई करण्यात येते. तसेच स्थानिक वृत्तापत्रांमध्ये वीजचोरी न करणेबाबत आवाहन करण्यात येते. महावितरण तर्फे वीजचोरीची माहिती देणाऱ्यास प्रोत्साहन देण्यासाठी महावितरणच्या नियमानुसार बक्षिस सुध्दा देण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील सॅण्डहर्स्ट रोड (प) येथील हॅकॉक पुलामुळे झालेल्या बाधितांच्या पुनर्वसनाबाबत**

**(२२) ५७०८७ (२८-०४-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सॅण्डहर्स्ट रोड (प), शिवदास चापशी मार्गावरील महापालिकेने बांधलेल्या हॅकॉक ब्रीजवर चार मार्गीका पूल असून उर्वरित एक बाजू सदर ठिकाणी असलेल्या सहा म्हाडा वसाहतीतील रहिवाश्यांचे पुनर्वसन न झाल्याने सदर ठिकाणी सुरु असलेल्या दोन मार्गीकेमध्ये वाहतुक कोंडी समस्या निर्माण होत असल्याचे मुंबई महापालिकेने म्हाडाच्या मुंबई दु. व पु. विभागास लेखी पत्राद्वारे अवगत केले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्यस्थितीत सदरहू ठिकाणी नियोजित सर्व्हिस रस्त्याचे बांधकाम करण्याकरिता शिवदास चापशी मार्गाची २७.४५ मीटर रुंदीचा मंजूर रस्ता रेषा संपादन करणे आवश्यक असून यामध्ये म्हाडाच्या सहा वसाहती व इतर तळमजला इमारती बाधीत होत असल्याने या वसाहतीचे निष्कासन करुन त्यांना निवासी सदनिका देणेबाबत महापालिकेतर्फे म्हाडास अवगत करण्यात आले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त हॅकॉक पुलाचे चार पैकी दोन उर्वरित मार्गीकांचे  काम पूर्ण करुन नियोजित सर्व्हिस रस्त्याचे बांधकाम करण्याबाबत शासनाने चौकशी केली करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०६-१०-२०२३) :**(१) व (२) अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दि.२६.०८.२०२२ रोजीच्या पत्रानुसार, शिवदास चापशी मार्ग येथील हॅकॉक पुलाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आले असुन, याकामामुळे बाधीत होणाऱ्या इमारती निष्कासित करण्याबाबत म्हाडाला कळविले आहे. या कामामुळे ७ उपकरप्राप्त इमारती तसेच मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत पुनर्रचित करण्यात आलेली १ इमारत बाधीत होत आहे.
(३) उक्त नमुद बाबींच्या अनुषंगाने म्हाडा व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या समन्वयाने कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारणे बाबत**

**(२३) ५७४४१ (२८-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे वास्तव्य असलेल्या मुंबईतील घाटकोपर येथील चिराग नगर भागातील झोपडपट्टीचा पुर्नविकास करून तेथील अण्णाभाऊ साठे यांच्या घराचे जतन करून त्यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याचा सन २०१९ मध्ये वा त्या सुमारास शासनाने निर्णय घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकासाठी जवळपास १७० कोटी रूपये खर्च येणार असून त्याबाबतचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडुन शासनाचे (गृहनिर्माण विभाग) मान्यतेसाठी सादर केला असल्याचे माहे जुन, २०२२ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्मारक उभारणीची जागा निश्चित करून बांधकामाबाबतची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्मारकांचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०५-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर स्मारकाची जागा निश्चित करण्यात आली असून, प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यापूर्वी सदरचा प्रकल्प Vital public project म्हणून घोषित करणे आवश्यक आहे. याबाबतची कार्यवाही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**टेंभा, थुगांव, खानापुर(ता.जि.अमरावती) येथील घरावरील विदयुत लाईन इतरत्र स्थलांतरीत करण्याबाबत**

**(२४) ५८२७३ (०३-०५-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभा, थुगांव, खानापुर(ता.जि.अमरावती) येथील घरांवर विदयुत वाहीनीच्या तारा या भागातून गेल्या असल्यामुळे सतत शॉर्ट सर्कीट होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शॉर्ट सर्कीटमुळे गावातील नागरिकांच्या जिवीतास हानी पोहचु नये याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ६ जुन, २०२२ रोजी व त्यासुमारास कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कं. मर्या. अमरावती यांना लेखी निवदेन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन उक्त गावांमधील घरांवरील विदयुत लाईन इतरत्र स्थलांतरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

आजतगायत सदर भागामध्ये वीज वाहिन्यांमध्ये शॉर्ट सर्किट होऊन अपघात घडल्याची कोणतीही घटना निदर्शनास आलेली नाही.

(२) हे खरे आहे.

मा. ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स. दि. ०६.०६.२०२२ चे पत्र अमरावती ग्रामीण विभाग या कार्यालयात प्राप्त झाले.

(३) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने गावकऱ्यांच्या घरावरुन गेलेल्या ऊपरी लघुदाब वीज वाहिनीचे रुपातंरण Arial बंच केबलमध्ये करण्याकरिता सर्व साधारण जिल्हा वार्षिक योजनेमध्ये महावितरणच्या वतीने सदरचा प्रस्ताव सादर असून मान्यतेनंतर काम करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## म्हाडाच्या कोकण मंडळाने अनामत रक्कम दुप्पट करण्याचा निर्णय घेतला असल्याबाबत

**(२५) ५८४७६ (०३-०५-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडाच्या कोकण मंडळाने अनामत रक्कम दुप्पट करण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रथम येणाऱ्यास प्राधान्य वर्गातील घरांसाठी एकूण किमतीच्या १० टक्के अनामत रक्कम घेण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर करण्याबाबत प्रशासनाचे एकमत नसल्यामुळे प्रस्ताव रखडला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सर्वसामान्यांना परवडणारी अनामत रक्कम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०६-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार अल्प व मध्यम उत्पन्न गटाकरीता अनामत रक्कम रु.५०,०००/- व रु.७५,०००/- इतकी आकारण्याबाबत प्राधिकरण स्तरावर मान्यता देण्यात आली आहे. सदर रक्कम प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य वर्गातील विक्री किंमतीच्या १०% पेक्षा कमी आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील बंद पडलेल्या गिरणी कामगारांना पुरावा नसल्याचे कारण देऊन अपात्र केल्याबाबत

**(२६) ५८५४५ (०२-०५-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील बंद पडलेल्या गिरणी कामगारांना दिनांक १ जानेवारी, १९८२ चा दाखला व वर्षाला २४० दिवस न भरल्याचा पुरावा नसल्याचे कारण देऊन अपात्र केल्या संदर्भातील प्रकरणे कामगार आयुक्त कार्यालयाकडे पाठविण्याची कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रश्नी अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने अपात्र केलेल्या गिरणी कामगारांना न्याय मिळवून देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०४-१०-२०२३) :**(१) सोडतीत यशस्वी ठरलेल्या ज्या गिरणी कामगारांना / वारसांना प्राधिकृत अधिकाऱ्यांनी अपात्र ठरविले आहे व ज्यांनी अपील अर्ज सादर केले आहेत, अशा गिरणी कामगारांची/वारसांची अपात्रतेची प्रकरणे कामगार अपिलीय अधिकाऱ्यांकडे पाठविण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२), (३) व (४)

गिरणी कामगारांची पात्रता निश्चित करण्याच्या प्रक्रियेमध्ये कमीत कमी मानवी हस्तक्षेप होण्याच्या दृष्टीने व सदर प्रक्रिया जलद गतीने होण्याकरीता संगणकीय प्रणाली तयार करण्यात आली आहे. गिरणी कामगार/ त्यांचे वारस यांच्याकडून प्राप्त अपील अर्जांचे स्कॅनिंग करून ते संगणकीय प्रणालीद्वारे संबंधीत अपिलीय अधिकाऱ्यांकडे ऑनलाईन पद्धतीने तसेच मूळ नस्तीसह पात्रता निश्चितीसाठी पाठविण्यात येत आहेत. त्यापैकी काही प्रकरणात अपिलीय अधिकाऱ्यांकडून अंतिम निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच, गिरणी कामगारांची पात्रता तपासणे, सोडत काढणे, सोडतीत यशस्वी ठरलेल्या गिरणी कामगारांना सदनिकांचा ताबा वेळेत मिळणे इ. बाबींवर संनियंत्रण ठेवण्यासाठी श्री.सुनिल राणे, मा.वि.स.स. यांच्या अध्यक्षतेखाली दि.१६.०५.२०२३ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहरातील आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकांकरिता प्रधानमंत्री आवास योजनेमधुन घरे देण्याबाबत

**(२७) ५८५४९ (०२-०५-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहरातील आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकांकरिता स्वतःचे हक्काचे घर देण्यासाठी अपूर्णावस्थेत असलेला प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्प पूर्ण करण्यासंदर्भात म्हाडाने कार्यवाही सुरु केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सर्वसामान्य गोरगरिबांना हक्काची घरे देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०५-१०-२०२३) :** (१), (२) व (३) नगर विकास विभागाने दिनांक ०२.१२.२०२२ च्या शासन आदेशान्वये भिवंडी निजामपूर महानगरपालिकेकडील ६३४८ घरांचा प्रकल्प म्हाडाने हाती घेण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

तथापि भिवंडी निजामपूर महानगरपालिकेने सदर क्षेत्र म्हाडाच्या नावे वर्ग केलेले नाही.

(४) ठाणे जिल्हयातील भिवंडी निजामपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोजे चाविंद्रा/पोगांव येथील आरक्षण क्र. १२४ अ येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या जमीनीवर म्हाडामार्फत प्रधानमंत्री आवास योजना राबवायचे झाल्याचे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका ने सदर क्षेत्र म्हाडाच्या नावे विनामुल्य वर्ग करून उपलब्ध करून देणे आवश्यक आहे .

तसेच सदर क्षेत्र म्हाडाच्या नावे वर्ग झाल्यानंतर नव्याने सर्व मंजूरी प्राप्त करून घेतल्यानंतर म्हाडामार्फत प्रकल्प राबविता येणे शक्य आहे.

---

## राज्यात खाजगी कंपन्यामार्फत वीज वितरणाबाबत

**(२८) ५८७०४ (२६-०४-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अदानी समूहाच्या महावितरणाच्या भांडूप विभागातील नवी मुंबई, ठाणे, तळोजा भागात वीज वितरणचा समांतर परवाना प्रलंबित असताना टोरेंटा पॉवर व टाटा पॉवरने राज्यातील इतर भागात वीज वितरण परवानगीसाठी विनंती अर्ज केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टोरेंट पॉवरने पुणे शहर, पुणे महानगर क्षेत्र, नागपूर महापालिका या क्षेत्रात तसेच टाटा पॉवरने औरंगाबाद, बीड, लातूर व नाशिक या शहरी भागात महावितरणच्या समांतर वीज पुरवठा करण्यासाठी विनंती अर्ज केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरणच्या सबसिडीवर याचा विपरीत परिणाम होणार आहे काय ,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अदानी समूहाच्या नवी मुंबई क्षेत्रासाठी, टोरेंटा पॉवरच्या पुणे व नागपूर शहरासाठी व टाटा पॉवरच्या औरंगाबाद, बीड, लातूर व नाशिक या शहरी भागातील महावितरणच्या समांतर वीज वितरण परवाना देणे संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२३) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

टाटा पॉवरने राज्यातील इतर भागात मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे समांतर वीज वितरण परवानासाठी केलेला अर्ज व केलेला नाही.

मे. टोरेंट पॉवर लिमिटेड यांनी ठाणे पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर, उल्हानगर, वसई विरार, अंबरनाथ महानगरपालिका, पालघर वाडा तालुकाचे आसपासचे क्षेत्र, बारामती, इंद्रापूर, दौंड, सासवड, रांजणगाव, चाकण, तळेगाव, कुरकुंभ व नागपूर जिल्हयाच्या आसपासच्या क्षेत्राकरिता समांतर वीज वितरण परवान्यासाठी तीन स्वतंत्र अर्जाव्दारे मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे अर्ज केला आहे.

(३) होय,

अदानी इलेक्ट्रीसिटी नवी मुंबई व टोरंट पॉवर लिमिटेड यांचा मा. आयोगाकडे सध्या प्रलंबित असलेल्या अर्जाच्या अनुषंगाने रु. ७,१९० कोटी एवढया क्रॉस सबसिडीचा महावितरणवर विपरीत परिणाम होऊ शकतो असा आक्षेप हरकतीमध्ये दिलेले आहे.

(४) मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे सदर बाब निर्णयार्थ प्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील जुन्या उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी शासनाकडून म्हाडाच्या मुंबई दु. व पु. मंडळास देय निधी मिळणेबाबत

**(२९) ५८९९४ (०२-०५-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.संजय पोतनीस (कलिना), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी),श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जुन्या व जीर्ण उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीकामासाठी २०० कोटी रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे मा.गृहनिर्माण मंत्री महोदयांनी दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी विधिमंडळाच्या शितकालीन सत्रात आश्वासन दिले हे खरे
आहे काय,

(२) असल्यास, शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार मुंबईतील जुन्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी जाहीर केलेल्या २०० कोटी रुपये निधीपैकी अद्याप प्रत्यक्षात किती रुपये निधी शासनाने म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास उपलब्ध करुन दिला आहे व किती देणे बाकी आहे,

(३) असल्यास, शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या निधिमधून मंडळातर्फे किती तातडीच्या इमारतींना दुरुस्तीसाठी निधीचे वितरण केले आहे व अद्याप किती इमारतींच्या दुरुस्तीचे काम निधीअभावी प्रलंबित आहे,

(४) असल्यास, सद्यस्थितीत इमारत दुरुस्ती कामाकरिता प्रती चौ.मीटर किती रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात येत असून यामध्ये शासनाने जाहीर केल्यानुसार किती रुपये निधीची वाढ करण्यात आली आहे,

(५) तसेच सन २०१८ पासून ते अद्यापपर्यंत महानगरपालिका व शासनातर्फे अंशदान स्वरुपात मुंबईतील जुन्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी दरवर्षी उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या वर्षनिहाय निधीची एकूण किती रक्कम मुंबई दु. व पु. मंडळास देणे बाकी आहे व यापैकी किती रुपये निधी अद्यापपर्यंत अदा केला आहे?

**श्री. अतुल सावे (०५-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सन २०१८-१९ व सन २०१९-२० मध्ये उपकरापोटी व शासन अंशदानापोटी अनुक्रमे रु.६८.४० कोटी व रु.५४.७२ कोटी तसेच म्हाड अधिनियम १९७६ कलम १६४ अंतर्गत सन २०१८-१९ व सन २०१९-२० प्रत्येकी रु.१०० कोटी असे एकूण रु. ३२३.१२ कोटी इतका निधी देण्यात आला होता. सदर निधीअंतर्गत १३४५ इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीची कामे पुर्ण केली असून, २४५४ इमारतीची कामे सुरु करण्यात आली आहे.
मुंबई शहरामध्ये सध्या १३०९१ इमारती उपकरप्राप्त असून, त्यांचे आयुर्मान जवळ जवळ संपुष्टात आलेले आहे. इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीची कामे ही उपलब्ध निधीनुसार हाती घेऊन पुर्ण केली जातात. प्रलंबित असलेली कामे पुढील वर्षी उपलब्ध होणाऱ्या निधीतून पुर्ण केली जातात.
(४) शासन निर्णय दि.०७.१०.२०२० अन्वये दुरुस्ती खर्चाच्या प्रचलित मर्यादेत रु. ४,०००/- प्रति चौ.मि. पर्यंत वाढ करण्यात आलेली आहे.
(५) सन २०१८-१९ ते सन २०२२-२३ या कालावधीतील दुरुस्ती उपकर व शासन अंशदानाची एकूण रु.१९५.०२ कोटीची थकबाकी असून, त्यापैकी पावसाळी अधिवेशन २०२३ मध्ये पुरवणी अंदाजपत्रकात रु. ९५.०२ कोटी मंजूर करण्यात आले आहे.

---

## मुंबईतील गिरणी कामगारांना एकच घर घेण्याचा निकषात बदल करण्याबाबत

**(३०) ५९०६८ (०३-०५-२०२३). श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील भांडुप येथे सुनंदा धोंडू कदम या मुन्शी जपचरण चाळ येथे सन १९६८ पासून राहत असून त्याठिकाणी एसआरए प्रकल्पाचे काम होत असून योजनेसाठी त्या पात्र ठरल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एसआरए प्रकल्प राबवणिाऱ्या विकासकाने सुनंदा कदम यांनी गिरणी कामगार योजनेत एका घराचा लाभ घेतला ही माहिती लपवून एसआरए योजनेत त्या घर घेत असल्याची तक्रार पूर्व उपनगर जिल्हाधिकारी (अतिक्रमण व निष्कासन) यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय योजनेत एकच घर घेण्याचा निकष मुंबईत सर्वत्र लावल्यास, हजारो गिरणी कामगारांना एसआरए किंवा खासगी प्रकल्पात असलेली घरे गमावण्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने गिरणी कामगारानां शासकीय योजनेत एकच घर घेण्याच्या निकषात बदल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (२७-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अशी कोणतीही तक्रार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्राप्त नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
शासकीय गृहनिर्माण योजनेंतर्गत एका व्यक्तीस एकदाच लाभ घेता येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव व शेगाव तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजनेची मंजूर घरे अपूर्ण असल्याबाबत

**(३१) ५९६३४ (०३-०५-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील १ हजार ४४१ व शेगाव तालुक्यातील ४४७ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेची मंजूर असलेल्या लाभार्थ्यांना पहिला हप्ता दिलेला असूनही काम अपूर्ण आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थ्यांना अनुदानाचा पहिला हप्ता मिळूनही सुद्धा लाभार्थ्यांनी काम सुरू न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, प्रधानमंत्री आवास योजनेची घरे दिनांक ३१ मार्च, २०२३ पूर्वी पूर्ण करावे असे शासनाने आदेश माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या सुमारास सुद्धा दिले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रधान मंत्री आवास योजनेची घरे लवकरात लवकर पूर्ण करून इतर लाभार्थ्यांना नवीन लाभ मिळण्यास मदत होणार असल्याने प्रलंबित घरकुले पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०५-१०-२०२३) :** (१) खामगांव येथे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) च्या घटक क्र.४ BLC मंजुर झालेल्या प्रकल्पांचा तपशील :-

| अ.क्र. | डी.पी.आर. | मुळ घरकुलांची संख्या | सुधारीत मंजुर घरकुलांची संख्या | प्रगतीपथावरील घरकुलांची संख्या | पुर्ण झालेल्या घरकुलांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०१ | १७२ | १३२ | ५५ | ०० |
| २ | ०२ | १०८ | ७६ | १७ | ०१ |
| एकूण | | २८० | २०८ | ७२ | ०१ |

खामगांव नगरपरिषद अंतर्गत डी. पी. आर.क्र. ०१ मधील १७२ घरकुलांच्या लाभार्थ्यांपैकी ५५ लाभार्थ्यांना व डी.पी. आर. क्र. ०२ मधील १०८ घरकुलांच्या लाभार्थ्यांपैकी ११ लाभार्थ्यांना पहिल्या हफ्त्याचा निधी देण्यात आला आहे.

डी.पी.आर. १७२ मधील ५ लाभार्थ्यांनी व डी.पी. आर. १०८ मधील ३ लाभार्थ्यांनी लाभ न घेण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे.

शेगांव येथील घटक क्र. ४ मंजूर BLC अंतर्गत प्रकल्पांचा तपशील:-

| अ.क्र. | डी.पी.आर. | मंजुर घरकुलांची संख्या | प्रगती पथावरील घरकुलांची संख्या | पुर्ण झालेल्या घरकुलांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | ०१ | ११६ | ०३ | ९२ |
| २ | ०२ | १०८ | १० | ७४ |
| ३ | ०३ | ८९ | ०४ | ६२ |
| ४ | ०४ | ९२ | ०३ | ३० |
| ५ | ०५ | ३७४ | ८९ | ०७ |
| ६ | ०६ | ११० | १९ | ०० |
| एकूण | | ८८९ | १२८ | २६५ |

शेगांव नगरपरिषद अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेच्या घटक क्रमांक ०३ AHP अंतर्गत ३५० घरकुलांचा प्रकल्प आहे.तथापि, सदर प्रकल्पाचे काम सुरू झालेले नाही.
(२) खामगांव व शेगांव नगरपरिषद अंतर्गत पहिल्या हफ्त्याचा निधी देण्यात आलेल्या लाभार्थ्यांचे घराचे बांधकाम पुर्ण अथवा प्रगतीपथावर आहेत
(३) केंद्र शासनाने प्रधानमंत्री आवास (शहरी) अंतर्गत घटक क्रमांक ०२ (CLSS) वगळता उर्वरित घटकांसाठी ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.
(४) खामगांव व शेगांव नगरपरिषद येथे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर लाभार्थ्यांना नोटीस बजावण्यात येऊन त्यांच्या घरोघरी जाऊन त्यांना घर बांधकाम सुरू करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

## जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंतांच्या पद भरतीबाबत

**(३२) ५९६९२ (०३-०५-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंतांची सन २०१९ मध्ये ९८२ जागांकरिता पदभरती राबविण्यात आली असून प्रत्यक्षात ५०० जागांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आल्यामुळे ४८२ जागा भरल्या गेल्या नाहीत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झालेल्या पदभरती मध्ये जागा वाढ करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदया यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागामध्ये सध्या १५०० हून अधिक कनिष्ठ अभियंता पदांच्या जागा रिक्त असून या जागा भरण्याकरीता विभागाने सन २०१९ च्या भरतीमध्ये ४८२ जागांची पदे समाविष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०२३) :** (१) वित्त विभागाने विशेष बाब म्हणून कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) पदाची भरती करण्यास मान्यता दिली होती, त्यानुसार डिसेंबर २०१९ अखेर ९८२ पदे रिक्त होती. परंतु पात्र व अर्हताधारण पदवी व पदवीधारक स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांसाठी ४८२ पदे राखून ठेवून उर्वरित ५०० पदे सरळसेवेने भरण्यास शासन मान्यता दिल्यानुसार जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(२) व (३) होय, सन २०१९ मध्ये वित्त विभागाने एक विशेष बाब म्हणून कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या संवर्गाची ५०० पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार त्यावेळी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. आता शासनाने ७५,००० पदे भरण्याची मोहीम हाती घेतली असून त्या अंतर्गत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गाची ८९७ पदे भरण्यास मान्यता दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील मुलुंड पूर्व, गवणापाडा, पीएमजीपी कॉलनीतील बेघर कुटुंबियांना घरे देण्याबाबत

**(३३) ५९७३४ (२६-०४-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मुलुंड (पूर्व), गवाणपाडा, पीएमजी कॉलनी, म्हाडा संक्रमण शिबीर, ३अ मध्ये राहणारे श्री. दशरथ कुडाळकर, श्रीमती अंजली घाडगे व इतर १६ संक्रमण शिबीरात रहात असलेल्या कुटुंबांना भारती भागवत या महिला एजंटने म्हाडा अधिकाऱ्यांना हाताशी धरून बेघर केल्याप्रकरणी मा.उच्च न्यायालयाने सदरहू १६ कुटुंबांना कायमस्वरुपी घरे देण्याचा तसेच तत्पुर्वी संक्रमण शिबीरात गाळा देण्याचे दि.२९.६.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशाचे तंतोतंत पालन करण्याचे आदेश देऊनही शासन तथा म्हाडाचे उपाध्यक्ष, मा.मुख्य अधिकारी, मा.सहमुख्य अधिकारी, मुंबई इमारत दु. व पु. मंडळ यांनी १६ बेघर कुटुंबांना घरे देण्याबाबत कोणतीच कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय?

(२) असल्यास, श्री.दशरथ कुडाळकर यांच्यातर्फे त्यांची पत्नी श्रीमती आरती कुडाळकर यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांची भेट घेऊन यासंदर्भात दि. २६.८.२०२२ रोजी त्यांना लेखी निवेदन दिल्यानुसार यावर म्हाडा उपाध्यांक्षाना त्वरीत १६ कुटुंबांना घरे देण्याबाबत आदेश देऊनही अद्याप यावर म्हाडाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने उक्त प्रकरणात हेतुपूर्वक मा.न्यायालय तथा शासनाचे आदेश न मानणाऱ्या संबंधित म्हाडा अधिकाऱ्यांविरुद्ध जबाबदारी निश्चित करुन तसेच संक्रमण शिबीराचे गाळे म्हाडा अधिकारी व स्थानिक पोलीसांशी संगनमत करुन उक्त १६ कुटुंबियांना बेघर करणाऱ्या एजंट भारती भागवत तसेच त्यांना सहकार्य करणारे संबंधित म्हाडाचे अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी उक्त १६ बेघर कुटुंबियांना तात्काळ मा.न्यायालयाच्या आदेशानुसार कायमस्वरुपी घरे देण्याच्या दृष्टीने शासनातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०५-१०-२०२३) : (**१) मा.उच्च न्यायालय, खंडपीठ मुंबई यांनी रिट याचिका क्र.५४५/२०१९ मध्ये दि.२९.०६.२०२२ रोजी पुढील प्रमाणे आदेश पारित केले आहेत :-

अर्जदार यांच्या कागदपत्रांची तपासणी करुन कायमस्वरुपी घरे देण्याबाबत पात्रता ठरवावी असे निर्देश दिले आहेत. परंतु, सदर आदेशामध्ये तद्पूर्वी संक्रमण शिबिर देण्याबाबत कोणतेही निर्देश दिलेले नाही.
(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने सदर प्रकरणाची वस्तुस्थिती मा.मुख्यमंत्री कार्यालयास दि.११.११.२०२२ च्या पत्रान्वये कळविले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी दि.२९.०६.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने सहमुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्याकडे दि.२८.०२.२०२३ व ०२.०६.२०२३ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सदर सुनावणीस एकही अर्जदार उपस्थित राहिले नाहीत. अर्जदार श्री.दशरथ कुडाळकर, श्रीम. अंजली घाडगे व इतर यांनी बृहतसूचीवरुन कायमस्वरुपी गाळा मिळण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने पुढील जाहिरातीस अनुसरुन अर्ज केल्यानंतर पात्रता निश्चित करुन कायम स्वरुपी गाळयाचे वितरण करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देऊळगांवराजा (जि.बुलढाणा) येथे केंद्र शासनपुरस्कृत प्रधानमंत्री आवास घरकूल योजनेत घरकुल बांधकाम प्रलंबित असल्याबाबत

**(३४) ५९८१४ (०३-०५-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देऊळगांवराजा (जि.बुलढाणा) येथे केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास घरकूल योजनेत सन २०२१-२२ या वर्षात मंजूर केलेल्या ६६८ घरकूलांपैकी तब्बल ६०० घरकूलांची बांधकाम अद्यापही पूर्ण झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने घरकूले तातडीने पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०५-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

देऊळगांवराजा, जि. बुलढाणा येथे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) च्या BLC घटक अंतर्गत २७१ EWS घरकुले बांधण्याच्या प्रकल्पांस केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीच्या दिनांक २०/०१/२०२१ रोजी झालेल्या ५२ व्या बैठकीत मंजुरी मिळाली होती. तद्नंतर देऊळगांवराजा नगरपरिषदेकडून २७१ EWS घरकुलांऐवजी १४५ EWS घरकुलांचा सुधारीत (Curtailment DPR) प्रकल्प अहवाल प्राप्त झाला आहे. या सुधारीत प्रकल्प अहवालास SLSMC च्या दिनांक २३/६/२०२३ रोजी झालेल्या ३६ व्या बैठकीत मंजुरी मिळालेली आहे. व CSMC ची मंजुरी अद्याप अप्राप्त आहे.
(२) व (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खारदेवनगर, चेंबुर (पूर्व) येथील संत गाडगे महाराज एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्थेस करारनाम्यानुसार सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३५) ५९८४२ (०३-०५-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारदेवनगर, चेंबुर (पूर्व) येथील संत गाडगे महाराज एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., या सोसायटीच्या विकासकांनी विकास करारनाम्यानुसार सोयी सुविधा उपलब्ध करुन न देता गृहनिर्माण संस्थेच्या १८० सभासदांची फसवणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संस्थेकडून वारंवार संस्थेला देय असलेल्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात अशी मागणी करुनही गेल्या ४ वर्षापासून विकासक जाणीव पुर्वक टाळाटाळ करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सोसायटीच्या विकासकाकडून अद्याप अभिहस्तांतरण (क्रन्व्हेअंस) ही करुन दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी करुन उक्त गृहनिर्माण संस्थेला विकासकाकडून देय असलेल्या सुविधा तात्काळ मिळाव्यात याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२७-०९-२०२३) :** (१ )व (२) हे खरे नाही.

सदर योजनेचे विकासक यांच्याकडून भोगवटा प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेल्या अटी व शर्तींची पूर्तता केल्यानंतर सदर संस्थेच्या पुनर्वसन घटकाच्या इमारतीस दि.२१.०६.२०१८ रोजी पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसंदर्भात विकास नियत्रण नियमावली प्रमाणे सोयी सुविधा जसे, बालवाडी-२, समाजकल्याण केंद्र-२, सोसायटी ऑफिस-२, सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

तसेच विकास करारनामा हा सदर सहकारी गृहनिर्माण संस्था व विकासक यांच्यामध्ये होत असतो. जर असा करारनामा झालेला असेल आणि करारनाम्यातील तरतुदींचे उल्लंघन होत असल्यास सदर संस्था याबाबत सक्षम न्यायाधिकरणामध्ये दाद मागू शकते.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

प्रस्तुत योजनेत अंत:र्भूत जमिन खाजगी असल्याने तसेच सदर जमिन प्राधिकरणामार्फत महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ चे कलम १४(१) अन्वये भूसंपादित केलेली नसल्याने प्रस्तुतचे क्षेत्र संबंधित जमिन मालक यांनी संस्थेला अभिहस्तांतरित करुन घेणे आवश्यक आहे. अथवा संस्थेने सदर जमिन मानीव अभिहस्तांतरित (Deemed Conveyance) बाबतची कार्यवाही करुन घेणे योग्य होईल. सदर संस्थेस अभिहस्तांतरण करुन घेणे ही बाब जमिन मालक व संबंधित संस्था यांच्या दरम्यानची आहे. सदरची कार्यवाही करुन घेणेबाबत संबंधितांना कळविण्यात आले आहे. मालकीबाबत खाजगी व्यक्ती आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांमध्ये वाद आहे. सदर वादाच्या अनुषंगाने महसूल विभागामार्फत प्रस्तुत जमिनीची मालकी निश्चित झाल्यानंतरच अभिहस्तांतरण/ भाडेपट्टयाबाबतची पुढील कार्यवाही करणे विकासकाला शक्य होईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गिरणी कामगारांसाठी सन २०१६ मध्ये म्हाडाकडून काढण्यात आलेल्या सोडतीमधील यशस्वी विजेत्यांना घर देण्याबाबत

**(३६) ५९८६२ (०३-०५-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणी कामगारांसाठी सन २०१६ मध्ये म्हाडाकडून काढण्यात आलेल्या सोडतीमधील यशस्वी विजेत्यांनी घरांच्या

संपुर्ण रकमेचा भरणा म्हाडाकडे केला असला तरीही अद्याप त्यांना घराचा ताबा देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, मध्यंतरीच्या काळात विनावापर असलेली सदरची घरे रहाण्यायोग्य नसले तरी प्रशासनाच्या दिरंगाईमुळे ताबा देण्यास विलंब झाला असला तरीही या दिरंगाई विरोधात दाद मागणार नाही असे हमीपत्र म्हाडाव्दारे विजेत्यांकडून घेण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदनिकांचा ताबा गिरणी कामगारांना देण्यापूर्वी या सदनिकांची दुरुस्ती व इतर कामांकरीता अपेक्षित असलेला खर्च एमएमआरडीएने करण्यासंदर्भात उचित आदेश देण्याची विनंती नगर विकास विभागास करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणत्याही हमीपत्राशिवाय घरांची तात्काळ दुरुस्ती करुन घरे विजेत्यांच्या ताब्यात देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. अतुल सावे (०४-१०-२०२३) :**(१) मुंबई गिरणी कामगारांसाठी मौजे कोन, पनवेल येथील रेंटल हाऊसिंग योजनेंतर्गत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून प्राप्त २४१७ सदनिकांसाठी म्हाडाकडून दि.०२/१२/२०१६ रोजी सोडत काढण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत सदर सोडतीमध्ये यशस्वी झालेल्या गिरणी कामगारांपैकी एकूण ४३० गिरणी कामगारांनी संपूर्ण रकमेचा भरणा केला असून, त्यांना वितरण पत्र देण्यात आलेले आहे.

(२) सदरची घरे कोव्हीड विलगीकरण कक्ष म्हणून वापरासाठी नवी मुंबई व पनवेल महानगरपालिकेकडे सुपुर्द करण्यात आली होती. सदर घरांची दुरावस्था झाल्याने, घरांची दुरुस्ती करुन द्यावयाची असल्याने ताबा देण्यास विलंब होत आहे.

यासंदर्भात गिरणी कामगार/ वारसांकडून त्यांच्या स्वखुशीने हमीपत्र भरुन घेण्यात येत आहेत.

(३) तत्कालीन मा.मंत्री (गृहनिर्माण) यांनी दि.०७.०४.२०२२ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार या घरांच्या दुरूस्तीवरील खर्च मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाने करावा, असा प्रस्ताव नगर विकास विभागाकडे पाठविण्यात आला होता. दरम्यान, दि.०९.०३.२०२३ रोजी म्हाडा व मुं.म.प्र.वि. प्राधिकरण यांच्यात झालेल्या बैठकीत मौजे कोन, पनवेल येथील २४१७ सदनिकांच्या दुरूस्तीचा खर्च मुं.म.प्र.वि.प्रा. व म्हाडा यांच्यात ८० : २० या प्रमाणात विभागण्यात यावा. तसेच सदरचा ८०% खर्च म्हाडाकडून मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाला प्राप्त होणाऱ्या सदनिकांच्या किंमतीतून वजा करून उर्वरीत रक्कम म्हाडाने मुं.म.प्र.वि. प्राधिकरणास हस्तांतरीत करावी, असा निर्णय सहमतीने घेण्यात आला. सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत नगर विकास विभागाने कळविले आहे. त्यानुसार शासनाच्या दि.१९.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये म्हाडास कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

(४) म्हाडामार्फत ११ इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या ई-निविदा मंजूर करुन इमारतींच्या दुरूस्ती कामाचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर इमारतींच्या दुरुस्तींचे काम पूर्ण होताच सोडतीतील यशस्वी गिरणी कामगार / वारसांना त्वरीत ताबा देण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील गोरेगांव (प) सिद्धार्थनगर गृहनिर्माण संस्थेच्या (पत्रा चाळ) पुनर्विकास प्रकल्पातील कुटुंबियांना थकित भाडे देण्याबाबत

**(३७) ६००५५ (२६-०४-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगांव (प) सिद्धार्थनगर गृहनिर्माण संस्थेच्या (पत्रा चाळ) पुनर्विकास प्रकल्पातील ६७२ कुटुंबियांना माहे जानेवारी, २०१८ पासून ते अद्यापपर्यंतचे दरमहा ४० हजार रुपये भाडे देण्याबाबत तत्कालीन गृहनिर्माण मंत्र्यांनी मान्यता दिली असून याबाबत विद्यमान गृहनिर्माण मंत्री यांनी देखील दि. २४.०८.२०२२ रोजी विधानसभेत आश्वासन देऊनही अद्याप उक्त ६७२ कुटुंबियांना थकीत भाडे देण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ६७२ रहिवाशी कुटुंबांच्या प्रतिनिधींनी दि. १२.०९.२०२२ रोजी म्हाडावर मोर्चा काढून व मुख्य अधिकारी यांना मागण्यांचे निवेदन देऊनही अद्यापही यावर शासन तथा म्हाडाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन ६७२ कुटुंबियांना थकित भाडे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०४-१०-२०२३) :**(१), (२), (३) व (४) मुंबईतील गोरेगांव (प) सिद्धार्थनगर गृहनिर्माण संस्थेच्या (पत्राचाळ) पुनर्विकासाअंतर्गत मूळ भाडेकरूना दरमहा रू.२५,०००/- घरभाडे देण्यात येईल, अशी घोषणा दि.२४.०८.२०२२ रोजी विधानसभा गृहात मा.उप मुख्यमंत्री तथा तत्कालीन मंत्री (गृहनिर्माण) यांनी केली होती. त्यानुसार, या पुनर्विकास प्रकल्पाच्या विकासकास म्हाडाने निष्कासित केल्यापासून म्हणजेच माहे जानेवारी २०१८ पासून मूळ गाळेधारकास दरमहा रू.२५,०००/- घर भाडे देण्यास दि.१२.०४.२०२३ च्या पत्रान्वये म्हाडास शासनाची मंजूरी देण्यात आलेली आहे.

सदर भाडे देण्याकरीता म्हाडाने उपनिबंधक सह. गृह. संस्था (पश्चिम उपनगरे) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. सदर समितीस सभासदांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या पडताळणीमध्ये ५४४ सभासद पात्र ठरले आहेत.

त्यापैकी, ५२८ सभासदांना जानेवारी २०१८ पासून मे २०२३ पर्यंतचे भाडे देण्यात आले आहे. उर्वरीत पात्र १६ सभासदांना भाडे देण्याची कार्यवाही सुरू आहे.

पडताळणी न झालेल्या तसेच विखुरलेल्या सभासदांची माहिती मिळण्याकरीता दि.२७.०४.२०२३ रोजी वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देण्यात आली होती.

---

## मुंबई, मुलुंड विभागात महावितरण कंपनीकडे विद्युत मीटरची असलेल्या कमतरतेबाबत

**(३८) ६०९४६ (०३-०५-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुलुंड विभागात अनेक ग्राहकांनी बिघाड झालेले विद्युत मीटर बदलून मिळण्याबाबत अर्ज वेळेत करूनही मीटर बदलून मिळण्यास विलंब झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती मीटरची कमतरता असुन वेळेत मीटर बदलून न मिळाल्यामुळे ग्राहकांना वीजेच्या देयकाचे बिल अंदाजे येत असल्यामुळे ग्राहकांमध्ये रोष निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुलुंड विभागातील ग्राहकांना वीज मीटर तातडीने मिळण्याबाबत शासनाने काही कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) नवीन वीज जोडणी तसेच जुने व नादुरुस्त मीटर बदलविण्यासाठी आवश्यकते नुसार सिंगल व थ्री फेज मीटरची खरेदी महावितरणव्दारे ई-निविदेच्या माध्यमातून करण्यात येते.

महावितरणमार्फत सन २०२२-२३ दरम्यान माहे मार्च-२०२२ मध्ये ई-निविदाअंतर्गत पुरवठादारांना १८ लक्ष सिंगल फेज व माहे मे-२०२२ मध्ये १.५ लक्ष नग इतक्या नवीन थ्री फेज वीज मीटरच्या पुरवठयाचे कार्यादेश देण्यात आले होते. सदर पुरवठांदारांकडून आजमितीस १७, ३६,००० सिंगल फेज व १,३८,००० थ्री फेज वीज मीटर क्षेत्रिय कार्यालयांना पुरविण्यात आले आहेत. तसेच माहे मार्च-२०२३ मध्ये ई-निविदाअंतर्गत पूरवठादारांना १२ लक्ष सिंगल फेज व २.५ लक्ष थ्री फेज वीज मीटरच्या पुरवठयाचे कार्यादेश देण्यात आलेले असून सदर पुरवठादारांकडून आजमितीस ५१,००० सिंगल फेज वीज मीटर क्षेत्रिय कार्यालयांना प्राप्त झाले असून उरलेल्या वीज मीटरचा पुरवठा प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर येथील महालक्ष्मी मंदिरातील आवारात पोलिस चौकी उभारण्याबाबत

**(३९) ६१०८७ (०४-०५-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील जगप्रसिद्ध महालक्ष्मी मंदिर (अंबाबाई मंदिर) आवारात कायमस्वरूपी मंदिरासाठी स्वतंत्र पोलिस चौकी स्थापन करण्याचा प्रस्ताव सुमारे १० वर्षापासून प्रलंबित असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंदिरात करवीर निवासिनी अंबाबाईच्या दर्शनाला भाविक येत असुन त्यांच्या सुरक्षतेकरिता तसेच सोयीसुविधा सुलभ होण्यासाठी देवस्थान समितीला सुमारे १०० खाजगी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करावी लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने अंबाबाई मंदिर पोलिस चौकीचा प्रस्ताव प्रलंबित असल्याची कारणे कोणती आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी भाविकांची सुरक्षा लक्षात घेता सदर मंदिरामध्ये पोलिस चौकी उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१०-२०२३) :**(१) कोल्हापूर जिल्हा पोलीस या घटकाचा सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाकडून शासनास सादर करण्यात आला असून, सदर प्रस्तावास वित्त विभागाने व उच्च स्तरीय सचिव समितीने मान्यता दिली असून, त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या निदेशानुसार आकृतीबंध मान्यतेनंतर नवीन पदनिर्मितीच्या अनुषंगाने स्वतंत्र पोलीस चौकी स्थापन करण्याचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार तपासून कार्यवाही करण्यात येईल.

(२) नाही

महालक्ष्मीच्या बाहेरील सुरक्षिततेकरिता पोलीस मुख्यालय, कोल्हापूर व जुना राजवाडा पोलीस ठाणेकडून एकूण १२ पोलीस कर्मचारी दिवसाकरिता व १२ पोलीस अंमलदार रात्रीकरिता असे एकूण २४ पोलीस अंमलदार नेमले आहेत. तसेच पोलीस मुख्यालयातील १ जलद कृती दल नेमले आहे. तसेच मंदिराकडे ये-जा करणा-या रस्त्यावर वाहतूक नियंत्रणासाठी व भाविकांची वाहने उभी करण्यासाठी शहर वाहतूक शाखेतील पोलीस अंमलदार नेमले आहेत. मंदिराच्या आतील बाजूस व गाभा-याकडे देवस्थान समितीने खाजगी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती केलेली आहे. दिवस व रात्री अंबाबाई मंदिरा सभोवती पोलीस गस्त नेमण्यात आले आहे.

(३) , (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईमध्ये शासकीय किंवा वन जमिनीवर अतिक्रमण करीत असलेल्या भूमाफियांबाबत

**(४०) ६१३०८ (२५-०४-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या माध्यमातून झोपडपट्ट्यांच्या जागी अनेक इमारती उभ्या राहिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर झोपडीधारकांना यात मोफत सदनिका मिळत आहेत, हे खरे आहे काय

(३) असल्यास, सदर सदनिका नियमबाह्य पद्धतीने विकून पुन्हा नव्याने झोपड्या उभ्या केल्या जात आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय किंवा वन जमिनीवर अतिक्रमण करीत असलेल्या भू माफियांवर शासनाच्या वतीने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२७-०९-२०२३) :** (१) हे खरे आहे.

विकास नियंत्रण नियमावली, १९९१ व विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ च्या विनियम ३३(१०) अंतर्गत प्रस्तावित व मंजूर झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये झोपडीधारकांच्या पुनर्वसनाकरिता व त्या मोबदल्यात विकासकास मिळणाऱ्या विक्री घटकामधून इमारती बांधण्याकरिता प्राधिकरणामार्फत नियमानुसार परवानगी दिली जाते व सदर परवानग्या प्राप्त केल्यानंतर काही योजनांमध्ये झोपड्या निष्कासित करुन इमारती बांधण्यात आल्या आहेत व काही योजनांमध्ये इमारती बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे आहे.

विकास नियंत्रण नियमावली, १९९१ व विकास नियंत्रण नियमावली २०३४ च्या विनियम ३३(१०) उपनियम १.१ अन्वये व शासन निर्णय क्रमांक झोपुयो-१००१/प्र.क्र.१२५/१४/झोपसु-१ दि.१६.०५.२०१५ अन्वये पात्र झोपडीधारकांना त्यांच्या संरक्षण पात्र झोपड्यांच्या बदल्यात मोफत सदनिका वाटप करण्यात येते.

तसेच शासन निर्णय क्र.झोपुधो-०८१०/८प्र.क्र.९६/२०१८/झोपसु-१ दि.१६.०५.२०१८ अन्वये दि.०१.०१.२००० नंतर परंतु दि.०१.०१.२०११ अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या झोपडीधारकांचे सशुल्क पुनर्वसन करण्याचे धोरण निर्गमित केले आहे.

(३) झोपडपट्टी कायदा १९७१ च्या तरतुदीनुसार वितरित करण्यात आलेली सदनिका १० वर्षापर्यंत विक्री न करता येण्याची तरतूद आहे. सदनिका कालमर्यादेपूर्वी विक्री केल्यास, सदर सदनिकाधारकावर महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या नियम ३(ई) अंतर्गत कारवाई करण्यात येते. तसेच नव्याने होत असलेल्या झोपड्यांवर सक्षम प्राधिकारी यांच्यामार्फत सातत्याने निष्कासनाची कारवाई करण्यात येते.

(४) महसूल व वन विभाग यांच्या परिपत्रक क्रमांक: जमिन-०९/२००८/प्र.क्र.१३६/ज-१ दिनांक १९.१२.२००८ अन्वये राज्य शासनाकडे निहीत असलेल्या कोणत्याही जमिनींवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावरील (मग तो कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या प्रभावाखाली असो किंवा नसो) अतिक्रमणे हटविण्यासाठी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ५० खालील अधिकार मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का), उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) व तहसिलदार (अति/निष्का) यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

त्यानुषंगाने अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का), पूर्व उपनगरे व अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का), पश्चिम यांचे अधिनस्त असणारे संबंधित उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) यांच्या कार्यालयामार्फत महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ५० अन्वये मागील दोन वर्षाच्या कालावधीत शासकीय जमिनीवरील एकूण १८६२ अतिक्रमणे निष्कासित करण्यात आलेली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## म्हाडा च्या पुणे महामंडळाच्या सदनिका सोडतीकरिता राबविलेल्या इंटिग्रेटेड लॉटरी मॅनेजमेंट सिस्टीम या स्वयंचलित प्रक्रियेतील त्रुटींबाबत

**(४१) ६१६६२ (२७-०४-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) पुणे मंडळाकडून सदनिकांच्या सोडतीसाठी राबविण्यात आलेल्या इंटिग्रेटेड लॉटरी मॅनेजमेंट सिस्टीम या स्वयंचलित प्रक्रियेतील त्रुटींमुळे दिर्घ कालावधी लागत असल्याचे दिनांक १० जानेवारी २०२३ रोजी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कागदपत्रांची छाननी प्रक्रिया पडताळणी आदींसाठी विलंब होत असल्याने नागरीकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इंटिग्रेटेड लॉटरी मॅनेजमेंट सिस्टीम या स्वयंचलित प्रक्रियेतील त्रुटी दुर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०६-१०-२०२३) :** (१), (२), (३) व (४) म्हाडा, प्राधिकरणाकडून यापुर्वी राबविण्यात आलेल्या सोडतीमधील यशस्वी अर्जदारांना कागदपत्रे ही संबंधीत बँक किंवा कार्यालयामध्ये सादर करावी लागत. सदर कागदपत्रात काही त्रुटी असल्यास अर्जदारास संबंधीत ठिकाणी जावे लागत होते.

तथापि, इंटिग्रेटेड लॉटरी मॅनेजमेंट सिस्टीममध्ये अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी व पात्रता निश्चिती ही सोडतीपुर्वीच होत असल्याने सोडतीनंतर पात्रता छाननीचा कालावधी हा कमी झाला असून, पात्रता निश्चितीच्या कागदपत्रांमध्ये २१ ऐवजी ७ कागदपत्रे निश्चित करण्यात आली आहे. नविन नियमानुसार अधिवास प्रमाणपत्र व आवश्यक दाखले अर्जदारांकडे विहीत नमुन्यात उपलब्ध नसल्याने सदरहू सोडत प्रक्रियेस म्हाडाच्या पुणे मंडळाकडून मुदतवाढ देण्यात आली आहे.

सदरहू प्रणालीमध्ये आवश्यक असलेले विहीत नमुन्यातील अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे अर्जदारांकडे उपलब्ध नसल्यास या कागदपत्रासाठी अर्ज केलेल्या अर्जदारांना पोचपावतीच्या अधिन राहून कागदपत्रे सादर करण्याच्या अटींवर पात्रता निश्चित करण्याची सुधारणा करण्यात आली आहे.

---

## सह. मुख्याधिकारी मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ यांनी तक्रारदाराला सुनावणीला न बोलविता अनुपस्थिति दाखविल्याबाबत

**(४२) ६१६८२ (२६-०४-२०२३). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सह. मुख्याधिकारी मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ यांनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ च्या पत्रान्वये अर्जदार/तक्रारदार यांना दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२२ रोजी सुनावणीची नोटीस काढली परंतु सदर नोटीस फक्त अर्जदार याला पाठविली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२२ रोजी सुनावणी झाल्यावर दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२२ रोजी तक्रारदाराला नोटीस पाठविली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून शासन दिनांक ०४ नोव्हेंबर,२०२२ च्या आदेशाला स्थगिती देणार आहे काय,

(४) असल्यास, सुनावणीचे पत्र ज्या अधिकाऱ्याने / कर्मचाऱ्याने रोखून ठेवले त्यांच्या विरुद्ध विभागीय चौकशी करण्यात आलेली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०५-१०-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे,

(३) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत सहमुख्य अधिकारी/दु. व पु. मंडळ तथा प्रथम अधिकारी यांनी दि.१४.०२.२०२३ रोजी अर्जदार यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यांच्याच दि.१६.१२.२०२२ च्या आदेशास मिळकत व्यवस्थापक, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी दि.२३.०२.२०२३ च्या पत्रान्वये तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.

(४) संबंधित कर्मचाऱ्याकडून अशा प्रकारच्या गंभीर चुका भविष्यात होऊ नयेत याकरिता संबंधित कर्मचाऱ्यास सक्त ताकीद देण्याबाबत शासनस्तरावरुन निर्देश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सुभाषनगर,चेंबूर (मुंबई) येथील म्हाडा वसाहतीच्या पुर्नविकासाबाबत

**(४३) ६१८५८ (०८-०५-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुभाष नगर चेंबूर (मुंबई) येथील म्हाडा वसाहतीमधील कांही इमारती आर.एन.ए. विकासकाने पुर्नविकास करण्यासाठी घेतल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकासकांनी अनेक इमारतींच्या पुनर्विकासाचे काम अद्यापही पूर्ण केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, इमारतींच्या पुनर्विसासाचे काम गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित ठेवणाऱ्या उक्त विकासकाची चौकशी करुन त्याच्यावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०४-१०-२०२३) :**(१) होय.

(२), (३) व (४) सुभाषनगर, चेंबूर, मुंबई येथील म्हाडाच्या अभिन्यासामध्ये एकूण ५८ सहकारी गृहनिर्माण संस्था अस्तित्वात आहेत. त्यापैकी एकूण २६ सहकारी संस्थांचा पुनर्विकास/समूह पुनर्विकास सन २००४-०५ पासून संस्थांकडून नेमण्यात आलेले विकासक मे. आरएनए यांच्याकडून करण्यात येत आहे. त्यातील ११ सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासाचे काम पूर्ण झालेले आहे तथापि सदरहू ११ संस्थांनी अद्यापही म्हाडाकडे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करणेकरीता प्रस्ताव सादर केलेला नाही.

उर्वरित संस्थांपैकी ६ सहकारी गृहनिर्माण संस्थांनी विकासकासोबतचा विकास करारनामा रद्द करुन म्हाडाकडे नव्याने पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर केला आहे त्यानुसार त्यांना देकारपत्र देण्यात आलेले आहे.

उर्वरित ९ सहकारी गृहनिर्माण संस्थांनी विकासक मे.आरएनए यांच्यासोबतचा विकास करारनामा योग्य कायदेशीर मार्गाने रद्द करुन म्हाडास नव्याने पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर केल्यानंतर, म्हाडामार्फ़त देकारपत्र जारी करण्याबाबतची कार्यवाही करता येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात उन्हाळ्यात होणाऱ्या वीजटंचाई बाबत**

**(४४) ६२३८० (२८-०४-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे एप्रिल व माहे मे, २०२२ मध्ये वा दरम्यान विजेची टंचाई निर्माण होऊन अपुऱ्या विजेमुळे अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उन्हाळयाच्या दिवसांमध्ये विजेची मागणी वाढत असल्याने अपुऱ्या विजेमुळे वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी शासन करत असलेल्या उपाययोजना काय आहेत,

(३) राज्यात निर्माण होत असलेली वीज ,राज्यात असलेली विजेची मागणी ,तसेच प्रतीमाणसी(दरडोई) होणारा वीज वापर यांचा मागील पाच वर्षाचा तपशील काय आहे,

(४) भविष्यात वाढणाऱ्या इलेक्ट्रिक वाहनांसोबत वाढती विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी तसेच किफायतशीर वीजनिर्मितीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

देशात उद्भवलेल्या कोळसा टंचाईमुळे महावितरण कंपनीने करारीत केलेल्या कोळशावर आधारीत औष्णिक विद्युत निर्मिती प्रकल्पांमधुन माहे एप्रिल २०२२ दरम्यान ६०% ते ७०% इतकीच वीज उपलब्ध होत असल्यामुळे राज्यात वीजेचा तुटवडा निर्माण झाला होता. तसेच, माहे एप्रिल २०२२ व मे २०२२ सुमारास वीजेच्या मागणीतही अचानक वाढ निर्माण झाल्यामुळे वीजेची उपलब्धता व मागणी यांमध्ये तफावत निर्माण झाली होती, परिणामी, विद्युत प्रणालीच्या सुरक्षिततेसाठी माहे एप्रिल २०२२ मध्ये राज्यभार प्रेषण केंद्राकडून राज्यातील काही वाहिन्यांवर तात्पुरत्या स्वरुपाचे आपतकालीन भारनियमन काही दिवस आवश्यकतेनुसार काही तास करण्यात आले होते.

(२) चालू वर्षी (मार्च २०२३ ते मे २०२३ दरम्यान) उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये वाढणारी वीजेची मागणी पुर्ण करण्यासाठी महानिर्मिती, एनटीपीसी व इतर खाजगी करारीत औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पांमधून पुर्ण क्षमतेने बीज निर्मिती करण्याबाबत महावितरणतर्फे सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, ३०० ते ४०० मे.वॅ. चे लघुकालीन वीज खरेदी करार करण्यात आलेले आहेत. या व्यतिरिक्त पंजाब व इतर राज्यासोबत २५० ते ५०० मे.वॅ. चे पॉवर बँकीग करार करण्यात आलेले आहेत. तसेच, कोयना व इतर करारीत जलविद्युत प्रकल्पांतून आवश्यकतेनुसार पुर्ण क्षमतेने म्हणजेच जास्तीत जास्त १९०० मे.वॅ. पर्यंत वीज निर्मिती करण्यात येत आहे. याशिवाय खुल्या बाजारातुन आवश्यकतेनूसार उपलब्ध दराने वीज खरेदी केली जात आहे. सदर उपाययोजना उन्हाळयातील वाढत्या वीजेच्या मागणीमुळे वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी महावितरण कंपनीतर्फे करण्यात येत आहेत.
(३) महावितरण कंपनीची उच्चतम वीजेची मागणी आणि वीजेची उपलब्धता तसेच, दरडोई वीज वापर याचा मागील पाचवर्षांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
|---|---|---|---|---|---|
| उच्च्तम मागणी (मे.वॅ.) | २१६०७ | २१५७० | २२५५४ | २४४०० | २५१४४ |
| वीजेची उपलब्धता (मे. वॅ.) | २०७४५ | २३४९२ | २२७९६ | २४४०० | २३३२६ |
| वीजेचा वापर (दरडोई युनिट) | १०७१ | १००२ | १००८ | १११३ | ११९२ |

(४) महावितरण कंपनीने एकुण ३८७३१ मे.वॅ. चे दिर्घकालीन वीज खरेदी करार केलेले आहेत. तसेच, येत्या पाच वर्षात ८८८ मे.वॅ. औष्णिक विद्युत ऊर्जा, १८९.४ मे.वॅ. जलविद्युत ऊर्जा व ९२०० मे.वॅ. सौर विद्युत ऊर्जा उपलब्धतेसाठीचे नियोजन करण्यात येत असून इलेक्ट्रिक वाहनांची मागणी बघता, भविष्यात येणाऱ्या वाढीव वीजेच्या मागणीची पुर्तता महावितरण कंपनीच्या उपरोक्त करारीत व प्रस्तावित क्षमतेमधून करण्यात येईल. तथापि, वाढीव वीजेची गरज भासल्यास अतिरिक्त लघुकालीन अथवा दिर्घकालीन वीज खरेदी करार आवश्यकतेनुसार करण्यात येतील व वीजेच्या वाढीव मागणीची प्रतिपुर्ती केली जाईल. तसेच, महावितरण कंपनीतर्फे वेळोवेळी वीजेच्या मागणी व उपलब्धतेचे अवलोकन व नियोजन करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील म्हाडाच्या वाटप झालेल्या सदनिकांबाबत

**(४५) ६२४१५ (२५-०४-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथे मागिल पाच वर्षांत म्हाडाने किती सदनिकांसाठी (घरे) लॉटरी काढली आहे. तसेच यात किती लॉटरी धारकांना आत्तापर्यंत प्रत्यक्षात सदनिकेचा ताबा मिळाला आहे.
(२) असल्यास, पायाभरणी न झालेल्या प्रकल्पांमधील सदनिकांसाठी लॉटरी काढण्यात आली आहे, हे खरे आहे का,
(३) सदनिकांचा ताबा न मिळालेल्या लाभार्थ्यांची संख्या किती आहे,
(४) म्हाडाच्या सदनिकांच्या लॉटरी साठी काय नियमावली आहे?

**श्री. अतुल सावे (०६-१०-२०२३) :** (१) म्हाडाच्या पुणे मंडळामार्फत मे २०१८ ते जानेवारी २०२३ या पाच वर्षाच्या कालावधीत राबविण्यात आलेल्या सोडतीमधील म्हाडाच्या एकूण सदनिकांची संख्या ही ६२२८ इतकी होती. तथापि, पुर्वीच्या वाटप न झालेल्या सदनिकांचा उक्त सोडतीमध्ये दुबार समावेश करण्यात आल्याने म्हाडा योजनेतंर्गत २३५३१ सदनिका तसेच २०% सर्वसमावेशक गृहनिर्माण व १५% सामाजिक गृहनिर्माण योजनातंर्गत १२२२४ अशी एकूण ३५७५५ सदनिकांची जाहिरात देण्यात आली.
आतापर्यंत, म्हाडा योजनेतंर्गत वाटप प्रक्रिया पुर्ण झालेल्या एकूण ३२४७ सदनिकांचा ताबा देण्यात आलेला आहे.

(२) २०% सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेतील तरतुदीनुसार विकासकास प्रारंभ प्रमाणपत्र (Commencement Certificate) प्राप्त झाल्यानंतर अशा सदनिकांचा सोडतीमध्ये समावेश करण्यात येवून जाहिरात काढण्यात येते.
(३) म्हाडा योजनेअंतर्गत ताबा न मिळालेल्या लाभार्थ्यांची संख्या २९८१ इतकी आहे.

तथापि, २०% सर्वसमावेशक गृहनिर्माण योजना व १५% सामाजिक गृहनिर्माण योजनेतील लाभार्थ्यांचे करारनामे व ताबा देण्याची कार्यवाही विकासकाकडून केली जाते.
(४) सोडतीबाबतची नियमावली म्हाडा अधिनियमातील तरतूदीनुसार असून सदरची नियमावली जाहिरातीसोबतच म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर माहिती पुस्तिकेसह प्रकाशित करण्यात येते.

---

**मुंबईतील कोळीवाड्यांमध्ये एसआरए प्रकल्प राबविण्यास कोळी समाजाने विरोध केल्याबाबत**

**(४६) ६२६१६ (२७-०४-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिवडी, सायन, देवनार यासोबत अन्य काही कोळीवाड्यांमध्ये एसआरए प्रकल्प राबविण्यास कोळी समाजाने विरोध केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोळीवाडे आणि गावठाण येथे एसआरए प्रकल्प राबविण्यात येणार नसल्याचे शासनाने जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पांना शासनाकडून स्थगिती देण्यात येऊनही विकासकांकडून मनमानी सुरु आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोळीवाडे व गावठाण येथे एसआरए प्रकल्पास स्थगिती देऊन काम करणाऱ्या विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२७-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत सदर कोळीवाडे व गावठाण यांच्या सिमा व हद्दी जोपर्यंत सक्षम प्राधिकरण यांचेमार्फत निश्चित होत नाही, तोपर्यंत या जागेवरील कोणतीही योजना स्वीकारली जाऊ नये, असे दि.०५.०४.२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने यंत्रणेतील सर्व संबंधितांना सूचित केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुबई मध्ये उमरखाडी परिसरात पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत**

**(४७) ६२६८७ (२४-०४-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.संजय जगताप (पुरंदर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मध्ये उमरखाडी परिसरात पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या इमारती आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारती जुन्या व जीर्ण झाल्या असून त्यांचा पुनर्विकास होणे गरजेचे असून देखील या इमारतींच्या पुनर्विकासाच्या आराखडा प्रक्रियेस विलंब होत असल्याने मागील १२ वर्षांपासून येथील नागरिक पुनर्विकासाच्या प्रतीक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जुन्या व जीर्ण झालेल्या इमारतीच्या पुनर्विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०६-१०-२०२३) : (**१) होय, हे खरे आहे.
(२) व (३)
उमरखाडी येथील पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या ०९ इमारतींसोबत ०४ पुनर्रचित इमारती, ०४ भुसंपादित इमारती, ०१ उपकरप्राप्त इमारत, अशा १८ इमारतींचा समुह पुनर्विकास प्रायोगिक तत्वावर राबविण्यासाठी प्राधिकरणाने दि.११.०७.२०१७ रोजीच्या बैठकीत मंजूरी दिलेली आहे. म्हाडा प्राधिकरणाने प्रायोगिक तत्वावर योजना राबविण्यास दिलेल्या मंजूरीनुसार १८ इमारतींच्या समुह पुनर्विकास योजनेची व्यवहार्यता तपासण्याचे काम मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## एलआयजी I, कोकण वसाहत सोसायटी, सर्वे नंबर २२, ४२A आणि ४७A चीकनघर, कल्याण (पश्चिम), (जि.ठाणे) येथील 'भूमी कॉलोसस्' कडून फ्लॅटचा ताबा देण्यास होत असलेला विलंब

**(४८) ६२८३४ (०८-०५-२०२३). श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एलआयजी I, कोकण वसाहत सोसायटी, सर्वे नंबर २२, ४२A आणि ४७A चीकनघर, कल्याण (पश्चिम), (जि.ठाणे) येथील 'भूमी कॉलोसस्' या नावाचा गृह प्रकल्पाचे बांधकाम मेसर्स पटेल ग्रुप अँड कंपनीने सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पामध्ये अनेक मध्यम वर्गीय लोकांनी आपले स्वतःचे हक्काचे घर व्हावे या उद्देश्याने कर्ज काढून विक्री करार करून घराचे बुकिंग केले आहे. परंतु दहा - बारा वर्षांचा कालावधी झाल्यानंतर देखील अद्यापपर्यंत या प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विक्री करारामध्ये फ्लॅटचा ताबा सन २०१७ पर्यंत देण्यात येईल अशी कंपनीची वचनबद्धता होती. मात्र मुदत संपल्यानंतरही मेसर्स पटेल ग्रुप अँड कंपनीने फ्लॅटचा ताबा सोपविण्यासंदर्भात निश्चित तारखेबाबत कोणताही अधिकृत पत्रव्यवहार केलेला नाही त्यामुळे अनेक नागरीकांनी कष्टाने कमावलेले पैसे या प्रकल्पामध्ये अडकले असून त्यांना घराचे भाडे व कर्जाचा हप्ता भरावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकल्पामध्ये पैसे गुंतविलेल्या संबंधितांना घराचा ताबा मिळण्याबाबत तसेच या प्रकल्पास विलंब करणा-या संबंधित कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०६-१०-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) म्हाडा कार्यालयाने पुनर्विकासाकरिता बांधकाम मंजुरी प्राप्त करण्याकरिता ना हरकत पत्र देतांना म्हाडाने बांधून दिलेल्या अस्तित्वातील गाळेधारकांच्या पुनर्वसनाबाबत अटी नमुद केलेल्या आहेत. विकासकाच्या विक्री सदनिकांबाबतचा विषय हा विकासक व खरेदीदार यांचे मधील आहे.

सदरहू विकासकाची नेमणूक संस्थेने केली असून त्यानुसार संस्था व विकासकामध्ये दि.३०/१२/२०१० रोजी विकसन करारनामा झाला असून त्यानुसार संस्था न्यायालयामध्ये दाद मागू शकते. तसेच, करारनाम्यामधील तरतुदीनुसार घराचा ताबा मिळण्याबाबत उशीर होत असल्याने गुंतवणूकदार हे रेरा या सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागू शकतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नापूर (ता.सिंदवाही, जि.चंद्रपूर) येथील हॉटेल नाईट किंग बार अॅन्ड रेस्टारेंट इतरत्र हलविण्यासाठी नागरिकांनी केलेल्या आंदोलनाबाबत**

**(४९) ६२८७७ (०९-०५-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नापूर (ता.सिंदवाही, जि.चंद्रपूर) येथील श्री कैलास शामराव गौरकर ह्यांनी शिक्षक कॉलनीतील राहत्या घरीच दिनांक २५ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास हॉटेल नाईट किंग बार अॅन्ड रेस्टारेंट सुरू केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या हॉटेल नाईट किंग बार अॅन्ड रेस्टारेंटमुळे शिक्षक कॉलनी परिसरातील विघार्थी,महिला आणि नागरिक यांना मोठ्या प्रमाणात मनस्ताप सहन करावा लागत असल्याने त्यांनी उपरोक्त हॉटेल इतरत्र जागी हलविण्यात यावे याबाबतचे निवेदन अधिक्षक उत्पादन शुक्ल चंद्रपूर यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यातील मागणी लक्षात घेता हॉटेल नाईट किंग बार अॅन्ड रेस्टारेंट हे हॉटेल इतरत्र हलविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (२०-१०-२०२३) :** (१) श्री. कैलास शामराव गौरकर यांनी हॉटेल नाईट किंग बार अॅन्ड रेस्टॉरंट, मौजे रत्नापूर, ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर येथे एफ. एल. ३ अनुज्ञप्ती मंजूर करण्यासंदर्भात केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करुन जिल्हा अबकारी समितीने दिलेल्या मान्यतेनुसार हॉटेल नाईट किंग बार अॅन्ड रेस्टॉरंट या नावाने एफएल-३ अनुज्ञप्ती दिनांक १५.०७.२०२२ रोजी मंजूर करण्यात आली आहे.

(२) यासंदर्भात, महिला मंडळ शिक्षक कॉलनी येथील ३८ निवेदनकर्त्यांनी दिनांक २१.०२.२०२३ रोजी अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, चंद्रपूर यांना सदरचे हॉटेल नाईट किंग बार अॅन्ड रेस्टॉरंट इतरत्र हलविण्याबाबत निवेदन दिले आहे.

(३) दिनांक २५.०३.२००८ रोजीच्या शासन अधिसूचनेमधील तरतुदीअन्वये ग्रामसभेस उपस्थित असणाऱ्या ग्रामस्थांपैकी ५० टक्के मतदारांनी किंवा उपस्थित महिला ग्रामस्थांपैकी ५० टक्के महिला मतदारांनी अबकारी अनुज्ञप्ती बंद करण्याबाबत मतदान केल्यास अनुज्ञप्ती बंद करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांच्याकडून करण्यात येते, ही बाब अधीक्षक, राउशु, चंद्रपूर कार्यालयाकडून संबंधीत तक्रारदार/ निवेदनकर्त्यास कळविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयासाठी पूर्णवेळ स्वतंत्र प्रकल्प अधिकारी नेमण्याबाबत**

**(५०) ६४८०१ (३०-०८-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयासाठी पूर्णवेळ स्वतंत्र प्रकल्प अधिकारी नेमण्यात यावा, अशी मागणी आदिवासी बचाव अभियान संघटनेतर्फे दिनांक १४ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०४-१०-२०२३) :** (१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयासाठी पूर्णवेळ स्वतंत्र प्रकल्प अधिकारी नेमण्याबाबतच्या आशयाची निवेदने कार्यासनास प्राप्त झाली आहेत.

(२) प्रकल्प अधिकारी, धुळे या पदावर आदिवासी विकास सेवेतील पूर्णवेळ स्वतंत्र अधिकारी यांना पदस्थापना देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.